शुक्रवार, ३ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ८८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 3 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-88 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

महत्त्वाची बातमी

## नाशिकनंतर नगरच्या नेत्यांचा पाणी सोडण्यास विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात पाणी सोडण्याच्या निर्णयाला नाशिकनंतर अहमदनगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शवला आहे. अहमदनगरच्या मुळा धरणातून मराठवाड्याच्या जायकवाडी धरणात पाणी सोडू नये, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर घोडेगाव चौफुला येथे माजी मंत्री आ. शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आले. तब्बल दोन तास हे रास्ता रोको आंदोलन सुरू होते. चालू वर्षी मुळा धरण पूर्ण क्षमतेने भरलेले नाही तसेच मुळा धरणाच्या लाभक्षेत्रातही पुरेसा पाऊस झालेला नाही. विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्याची पातळी खालावली आहे, अशा परिस्थितीत अहमदनगर जिल्ह्यातल्या मुळा, भंडारदरा आणि निळवंडे धरणांची वस्तुस्थिती माहिती असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी मुळा धरणातून २.१० टीएमसी पाणी जायकवाडीला सोडण्याचा घेतलेला निर्णय एकतर्फी असल्याचे आमदार शंकरराव गडाख यांनी म्हटले. दरम्यान नगर- नाशिक जिल्ह्यातील पाणी मराठवाड्याला मिळावे यासाठी मराठवाड्यातील नेते एकत्रित येतात मात्र नगर-नाशिकचे नेते एकत्र येताना दिसत नाही, अशी खंतही गडाख यांनी व्यक्त केली.

# आणखी वेळ द्या, आरक्षण नक्की मिळेल

## निवृत्त न्यायमूर्तींचे मनोज जरांगे पाटीलांना आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : एक दोन दिवसात कोणतंही आरक्षण मिळत नसते, कोर्टात ते आरक्षण टिकणारे नसते, घाई गडबडीमध्ये कोणतेही आरक्षण मिळत नाही, असे निवृत्त न्यायमूर्तींनी मनोज जरांगे यांना सांगितले. घाईत घेतलेला निर्णय कोर्टात टिकणार नाही, अजून काही वेळ द्या, आपल्याला अपेक्षित आरक्षण मिळेल, असेही त्यांनी सांगितले. मनोज जरांगे यांना भेटायला राज्य सरकारचे एक शिष्टमंडळ जालन्यात गेले होते.**



**इस्लाम धर्मात जाती आहेत का?**
माळी समाजाचा व्यवसाय शेती, बागवान समाजाचा व्यवसाय शेती, जाती भिन्न-भिन्न आहेत. मुस्लीम धर्मात जाती आहेत का? याचे तुम्ही मला उत्तर द्या. इस्लाम धर्मात जाती आहेत का? तर या 11 जणांना तुम्ही आरक्षण दिले कसे? असे प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केले. जरांगेंच्या इस्लाम धर्माच्या प्रश्नावर निवृत्त न्यायाधीशांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. आता जे काही करायचे आहे त्यामध्ये एक अडचण अशी आहे, सुप्रीम कोर्टाने म्हटले की तुम्ही या पद्धतीने करा. म्हणून आपण या पद्धतीने करु, असे निवृत्त न्यायाधीश म्हणाले.

कुणबी प्रमाणपत्रासाठी मराठवाड्यापुरते नव्हे तर राज्यात काम करा, असे मनोज जरांगे यांनी या समितीला सांगितले. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र का देऊ शकत नाही? असा सवालही त्यांनी केला. त्यावर नि. न्यायमूर्तीं म्हणाले की, मराठे हे मागास असल्याचे सिद्ध झाले नाहीत, असे निरीक्षण सुप्रीम कोर्टाने नोंदवले आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितल्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. नि. न्यायमूर्ती सुनील बी शुक्रे, आणि नि. न्यायमूर्ती एम जी गायकवाड, माजी अध्यक्ष, राज्य मागासवर्ग आयोग यांनी गुरुवारी आंतरवाली सराटीमध्ये जाऊन जरांगे यांची भेट घेतली. आरक्षण नक्की मिळेल, पण घाईगडबडीत निर्णय होऊ नये. घाईत घेतलेले निर्णय कोर्टात टिकत नाहीत. कायदेशीर बाबी तपासूनच निर्णय घ्यावे लागतील. एक दोन दिवसात कोणतेही आरक्षण मिळत नाही. असे निवृत्ती न्यायमूर्तींनी जरांगेंना सांगितले. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्याचा प्रयत्न सुरु आहे. आणखी थोडा वेळ द्या, नक्की आरक्षण मिळेल. मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी आंतरवाली सराटी या ठिकाणी मनोज जरांगे यांनी आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा नववा दिवस आहे. पुराव्याच्या आधारे सरसरट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अर्धवट आरक्षण घेणार नाही, असा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या मंत्रिंमडळातही चर्चा झाली. पण सरसकट प्रमाणपत्र देण्यात येणार नाहीत असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर जरांगे यांनी उपोषण कायम ठेवले होते. तुम्हाला मराठ्यांमध्ये मराठा, कुणबी वेगळा असा फरक करायचा आहे का?, असा प्रश्न जरांगे यांनी विचारला. त्यावर निवृत्त न्यायमूर्तींनी उत्तर दिले. मागासवर्ग आयोगाने ज्या ज्या जाती मागासलेल्या आहेत असे निरीक्षण केले त्या सर्व जातींना आरक्षण दिलेले आहे. यामध्ये मराठा ही मागासलेली जात आहे, असे नमूद झालेले नाही. हे सुप्रीम कोर्टानेदेखील म्हटले आहे. पण आपण त्यात सुधारणा करत आहोत, असे निवृत्त न्यायमूर्तींनी सांगितले.

## मराठा आंदोलनाविरोधात मुंबई हायकोर्टात गुणरत्न सदावर्तेंकडून याचिका दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर




घडामोडींना वेग आला. काही ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण लागले. अनेक ठिकाणी मराठा कार्यकर्त्यांनी रस्ता रोखत टायर जाळून आंदोलन केले. तर काही ठिकाणी शांततेत आंदोलन सुरु आहे. पण काही ठिकाणी जाळपोळ आणि दगफेकीच्या देखील घटना घडल्या आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर चुकीची माहिती, फोटो, व्हिडीओ पसरु नये, यासाठी जालना, बीड या दोन जिल्ह्यांसह छत्रपती संभाजीनगरच्या ग्रामीण भागात इंटरनेट सेवा तात्पुरती बंद करण्यात आली. तर दुसरीकडे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आंदोलनाविरोधात मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली.

गुणरत्न सदावर्ते यांनी कोर्टात मराठा आरक्षणाच्या विरोधात याचिका दाखल केली होती. त्यांनी केलेल्या युक्तिवादानंतर सुप्रीम कोर्टात मराठा आरक्षण टिकले नाही. मराठा समाज मागास नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या याबाबतच्या वक्तव्यांवरुन काही मराठा कार्यकर्त्यांनी मुंबईत आक्रमक पवित्रा उचलला होता. काही मराठा कार्यकर्त्यांनी सदावर्ते यांच्या घराच्या खाली उभ्या असलेल्या त्यांच्या गाडीच्या काचा फोडल्या होत्या. दुसरीकडे बीड जिल्ह्यात लोकप्रतिनिधींचे घरे आणि कार्यालयांना आग लावण्याचेदेखील प्रकार घडले. यानंतर सदावर्तेंनी कोर्टात धाव घेतली. सदावर्तेंच्या याचिकेवर 8 नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. मराठा आंदोलकांच्या विरोधात कारवाई करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. त्यामुळे या सुनावणीत मराठा समाजाकडून कोण युक्तिवाद करतो, तसेच कोर्ट काय निकाल देते? ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या आठ दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून ओबीसी आरक्षात समावून घ्यावे, अशी मनोज जरांगे यांची मागणी आहे. पण त्यांच्या या मागणीला ओबीसी नेत्यांनी विरोध केलाय. ओबीसी नेत्यांनी मनोज जरांगे यांच्या मागणीच्या विरोधात राज्यभर आंदोलने केली. त्यानंतर सरकारने कोणत्याही समाजाच्या वाटेचे आरक्षण कमी करुन मराठा समाजाला आरक्षण देणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच ज्यांच्या मराठा कुणबी अशा जुन्या नोंदी सापडतील त्यांना ओबीसी आरक्षण दिले जाईल, असा निर्णय सरकारने घेतला.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# कोण कुणाकडे राहतंय ?

आधुनिक केसरी

त्या प्रगतीच्या जोरावर तो अंतरिक्षात फिरून आला पण त्याच्या मनातली उदासीनता, असमाधानाची भावना काही गेली नाही. पुढे कवी म्हणतो  लागले न हाताला  काही अविनाशी काही अविनाशी त्याच्या हाताला अविनाशी असे काहीच लागले नाही. सगळ्या गोष्टी विनाशीच आहेत. पुढील दोन कडवी फार सुंदर आहेत. क्षितिज तुझ्या चरणांचे दिसते रे दूर दिसते रे दूर घेऊन मी चालू कसा भरलेला ऊर भरलेला ऊर. परमेश्वराच्या चरणांना कवी क्षितिज असे म्हणतो. क्षितिज जवळ आल्यासारखे वाटले तरी प्रत्यक्षात ते लांबच असते. अनेक वासनाविकारानी, जीवनातील ताणतणावांनी कवीचे हृदय व्यथित झाले आहे. असा हा ' भरलेला ऊर ' घेऊन त्याच्यापर्यंत जाता येत नाही. कवितेची शेवटची दोन कडवी पहा. कवी म्हणतो जरि वाटे जड कळले तळ कळला नाही
तळ कळला नाही. जड म्हणते ' माझा तू ' क्षितिज म्हणे ' नाही ' क्षितिज म्हणे ' नाही. 'या ओळीत कवीला सांगायचे आहे की भौतिक प्रगती आपण केली की आपल्याला अगदी स्वर्ग जिंकल्याचा भास होतो. आपल्याला सगळे कळले असे वाटते. पण ' तळ ' म्हणजेच मूळ गाभा, शक्ती किंवा चैतन्य आपल्याला कुठे कळलेले असते ? आपण त्यापासून अनभिज्ञच असतो. जड आणि चेतन, पार्थिव आणि अपार्थिव अशा एका विचित्र कोंडीत तो सापडला आहे. जडाशी जखडला आहे. अशा वेळी क्षितिज ( म्हणजे ईश्वरी सत्ता ) त्याला सांगते की तू केवळ जडाचा, पृथ्वीचा नाहीस माझाही आहेस. अशा वेळी माणूस हतबल झाला आहे. काय करावे हे त्याला कळत नाही. ' जिवलगा राहिले दूर घर माझे ' या आपल्या कवितेत कवयित्री शांता शेळके म्हणतात. निराधार मी मी वनवासी घेशील केव्हा मज हृदयासी तूच एकला नाथ अनाथा महिमा तव गाजे. अशी आर्त प्रार्थना करण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही. त्याची कृपा झाली की हे भवबंध तुटू शकतात. आणि खरोखर ज्याला ' माझे ' असे म्हणता येईल त्या 'दूरच्या' घरापर्यंतचा आपला प्रवास सुखकर होईल.





## आनंदी पहाट

# आध्यात्मिक शंकांची उत्तरे मिळवणे मार्गस्थ होण्याचे लक्षण

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

देवत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व चारचौघांपेक्षा निराळं असतं. हे देवत्व त्या व्यक्तीच्या विचार, वर्तन, व्यवहारातून सदैव दिसत असतं. अशीच व्यक्ती संत म्हणून देखील ओळखली जाऊ लागते. अशा व्यक्तीच्या कृतीतून, प्रकृतीतून समाजातील विकृती दूर करू शकणाऱ्या संस्कृतीचं दर्शन होत असतं. आपण जो ब्रह्मानंद सेवन करतो त्याचं सर्वांनी सेवन करावं, धन्य होऊन जावं, ह्या एकाच प्रेरणेनं प्रभावित होऊन देवत्व प्राप्त झालेली व्यक्ती सर्वांना स्वतःच्या विचार, वर्तन, व्यवहाराच्या माध्यमातून अनेकविध साक्षात्कार घडवत असते. भगवंताच्या नामाची थोरवी गाता गाता आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण विलक्षण कसा होत जात असतो, ह्याची थेट प्रचीती अशी देवत्व प्राप्त झालेली माणसं देत असतात. केवळ लोककल्याण करण्याच्या हेतूनं, आपलं आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा आणि प्रेमाचा महिमा थेट प्रचीती देऊन पटवून देण्याचं काम ही मंडळी सदोदित करत असतात. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात तसंच विचारांत, वर्तनात आणि व्यवहारांत चुकून देखिल मी पणा अथवा माझे पणा दिसत नसतो. हेच त्यांच्या पूर्णत्वाचं गमक, संत असल्याचं आणि त्यांच्यात देव असल्याचं मूळ लक्षण होय. अर्थात स्वतःबद्दल काहीच करायचं न उरल्यामुळे केवळ जगाचं कल्याण व्हावं एवढीच त्यांची भावना असल्याचं त्यांच्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारातून दिसून येत असतं. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे प्रेमाचा पाझर फुटणारं आध्यात्म होय. प्रापंचिकाच्या प्रत्येक आध्यात्मिक शंकेचं उत्तर हे खरं तर आपल्या सकारात्मक विचार, वर्तन व्यवहारात सापडू शकतं, त्याची जाणीव आपण करून घेणं जरुरीचं असतं.



आधुनिक केसरी

**म्हणूनी पंढरी | श्वास झाला ||**

अंतरीचा भाव | अभंग सांगतो ||
विठ्ठलाचे गातो | गुण आम्ही ||१||
आम्हा संजिवनी | लाभली कृपेने ||
चैतन्याचे गाणे | गातो सदा ||२||
सुख दुःख आम्ही | अर्पिली विठ्ठले ||
आनंद सोहळे | सर्वकाळ ||३||
कानात सांगतो | विठ्ठल आमुच्या ||
कर्म साधनेचा | जपा छंद ||४||
निष्काम भावना | रूजली अंतरी ||
म्हणूनी पंढरी | श्वास झाला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


बाळकाचे जातां प्राण । अंतीं होये विस्मरण ।
तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ॥४६॥
गर्भीं म्हणे सोहं सोहं । बाहेरी पडतां म्हणे कोहं ।
ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ॥४७॥
दुःखा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला । सर्वेंच कष्ट विसरला । गर्भवासाचे ॥



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ज्ञान प्रवाह अनन्त है, सद्गुरु रुप महान ।
ईश्वरत्व जीवन बना, व्यक्त रुप भगवान
।।१५।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल प्रथम अध्याय)
०६/०१/१५ पृ. क्र. ८६५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरू कोणी व्यक्ती नाही किंवा ते जीव कोटीत येत नाहीत. ते महान विभु, व्यक्त रूपात परमात्माच असतात. त्यांच्यात परमेश्वराचे सर्व दिव्य गुण विद्यमान असतात. त्यांच्या महान आत्म्यात परम सत्तेचे दिव्य आणि अनंत ज्ञान सतत प्रवाहित असते. तेच अमर, महान पुरुष
जग -जीवांचे उद्धारकर्ता असतात, अन्य कोणीही मरणधर्मा, जीव कोटीतील गुरू किंवा गुरुवा नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

रणभूमीवर शस्त्रसंभार तर होताचं विशेष म्हणजे या कोलाहलात देवगण मृदुंग वाजवत होते. दैत्यांचा समाचार घेत घेत ती महिषासुराच्या निकट जात होती. देवगणांनी केलेल्या घंटानादांनी  कित्येक असुर शत्रू मरण पावले. शत्रुच्या सैनिकांना आपल्या हातातील फास, त्यांच्या मानेभोवती टाकून त्यांना बांधून फरफटत नेले तर कित्येकांनी तीक्ष्ण शस्त्रांनी, तलवारीने आघात केले. कित्येकांना गदेच्या टोकावर घेऊन लोळविले. छातीत शूळ भोसकून मारले. कित्येकांच्या माना कापल्या,हातपाय तुटले, कमरेत मार देऊन दोन तुकडे केले. राक्षस कुळातील बलाढ्य असुर मेले, कित्येकांनी शिरे गमावली आणि दैत्यांना देवी करत असलेल्या प्रचंड पराक्रमाची जाणीव झाली. आपण देवी पुढे अगदी तोकडे आहोत ह्याची असुरांना जाणीव झाली. राक्षस वीरांचे की ज्यांच्यावर आघात झाले ते पण निर्धाराने लढत असल्याने आपल्या जखमांच्या कडे दुर्लक्ष करत लढले. पडत होते परत उठत होते. मस्तकविहीन झालेले असुर मात्र समोर काही दिसत नसल्याने आवेशाने लढून  असुरपक्षात उत्पाद मांडत होते. (त्यांचे मस्तक कापले होते,धड फक्त शिल्लक होते त्यामुळे आपण आपल्याच लोकांशी युध्द करतो आहोत हे  त्यांना कळत नव्हते).

# नाम आणि सत्कर्म

आधुनिक केसरी

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्म सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा एखादा मनुष्य नुसते तोंडाने 'राम राम' म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग 'राम राम' म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वतःसिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण 'जेथे माझे नाम तेथे मी पुरूषोत्तम' असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन्ही गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम घेणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत नाही.



किंबहुना नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाराची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच. परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, "तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे 'नाम' हे होय." त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने 'रामा !' अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

## संत मुक्ताबाई

उपासना केली. आपल्यानंतर आपली मुल सुखी रहावीत या आशेने विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांनी निर्दय समाजाने दिलेल्या देहांत प्रायःश्चिताचा निर्णय मान्य करून देहत्याग केला. मातापित्याच्या या देहत्यागानंतर या अनन्य साधारण कुटुंबाच्या गृहीणीपदाची नाजूक जबाबदारी मुक्ताबाईंवर पडली. ती तितक्याच समर्थपणे तिने उचलली आणि पेलली. आपल्या भावंडांची जणू ती माउलीच झाली. त्यामुळे खेळण्या-बागडण्याच्या वयातच मुक्ताई प्रौढ, गंभीर, सोशिक समंजस बनली.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ३ नोव्हेंबर २०२३



स्थलकालाशी जोडलेल्या आठवणींचा कोलाज पान ६



कांदा रडवतो म्हणे...! पान ७

# पंडित धीरेंद्र शास्त्रींना विरोध करणाऱ्या अंनिसवर कारवाई करा !

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथे आयोजित बागेश्वर धामच्या पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने विरोध केला आहे. तसेच त्यांच्यावर अनेक बिनबुडाचे खोटे आरोपही केले आहेत. हिंदु संतांना नाहक त्रास देऊन हिंदूच्या धार्मिक भावना दुखावण्याचा आणि सामाजिक शांतता बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अंनिसवाल्यांचा हिंदु जनजागृती समिती जाहीर निषेध करते. बागेश्वर धामच्या पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमात अंनिसवाल्यांनी गोंधळ घातल्यास वा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास हिंदु समाज हे कदापि सहन करणार नाही. त्यामुळे हिंदु संतांच्या कार्यक्रमात अडथळे आणणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांवर आणि या कार्यक्रमाला विरोध करणाऱ्या हिंदू विरोधकांवर या कार्यक्रमाच्या काळात कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे उत्तर महाराष्ट्र संघटक प्रशांत जुवेकर यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केली. या पत्रकार परिषदेला हिंदु जनजागृती समितीच्या मराठवाडा संघटक कु. प्रियांका लोणे, संकल्प हिंदू राष्ट्र अभियानाचे संस्थापक अध्यक्ष कमलेश कटारिया आणि राष्ट्रीय बजरंग दलाचे देवगिरी प्रांताचे अध्यक्ष सुभाष मोकरिया हेही उपस्थित होते. या वेळी जुवेकर म्हणाले की, यापूर्वीही पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्या नागपूर येथील कार्यक्रमाला अशाच प्रकारे तीव्र विरोध केला होता; मात्र पोलीस चौकशीत पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्याकडून कोणताही अपराध पडला नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले होते. त्यामुळे त्यांना आता विरोध करण्याचे काहीच कारण नव्हते. पंडित धीरेंद्र शास्त्री हे ख्रिस्त्यांच्या 'चंगाई सभी प्रमाणे कोणतेही चमत्कार दाखवत नाहीत. ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या 'आंधळ्याला दिसू लागेल, लगडा घालू लागेल' असे खोटे दावे करून ते कुणाला लुबाडतही नाहीत. तरी देखील अंनिसवाले ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या चंगाई सभांना विरोध करत नाही, तसेच भररस्त्यात स्वतःच्या अंगावर शस्त्रांनी फटके मारत रक्तबंबाळ होत 'मातम' करणाऱ्यांना कधी आव्हान देत नाहीत, यातून ते केवळ हिंदू संतांनाच लक्ष्य करतात, हेच सिद्ध होते. कु. प्रियांका या वेळी म्हणाल्या की, सध्या राज्यातील सामाजिक शांतता धोक्यात कशी येईल. यासाठी अंनिसवाल्यांचे हे षड्यंत्र तर नाही ना, अशी शंका येते. वर्तमानात महाराष्ट्रात लागू असलेल्या जादूटोणाविरोधी कायद्यातील कोणत्याही कलमानुसार गुन्हा होईल, अशी कोणतीही कृती या कार्यक्रमात होत नाही. आम्ही या कायद्याला विरोध केला होता, तेव्हा आम्ही व्यक्त केलेली भीती आज खरी ठरत आहे. जादूटोणा कायद्याद्वारे हिंदु संतांना नाहक अडकवणे, हिंदूच्या धर्माचरणावर गदा आणणे, हेच अंनिसवाल्यांना करायचे होते. आम्ही या गोष्टींना विरोध केल्याने या कायद्यातील २७ पैकी १५ कलमे वगळली होती. आजही या कायद्याचे भय दाखवले जात आहे. त्यामुळे हा हिंदूंवर अन्याय करणारा हा कायदाच रहित करावा, अशीही मागणी आम्ही करत आहोत. बागेश्वर धामच्या पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमात अंनिसवाल्यांनी गोंधळ घातल्यास वा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास हिंदु समाज हे सहन करणार नाही. त्याला सर्वस्वी पोलीस प्रशासन आणि अंनिसवाले जबाबदार असतील. हे लक्षात घेता, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी आणि या कार्यक्रमाला विरोध करणारे हिंदू विरोधक यांवर या काळात कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रीय बजरंग दलाचे देवगिरी प्रांताचे अध्यक्ष सुभाष मोकरिया आणि संकल्प हिंदू राष्ट्र अभियानाचे संस्थापक अध्यक्ष कमलेश कटारिया यांनी यावेळी केली.





# आंदोलनात बिगरमराठे समाजकंटक, मला मराठा कार्यकर्त्यांनी वाचवले

## आमदार प्रकाश सोळंके यांचे स्पष्टीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावर मराठा आंदोलकांनी हल्ला केल्याची बातमी समोर आली होती. आंदोलकांनी त्यांच्या गाड्या आणि बंगल्याला आग लावली होती. तसेच त्यांच्या बंगल्यावर दगडफेक करण्यात आली होती. या घटनेवर आमदार प्रकाश सोळंके यांनी सर्वात मोठा गौप्यस्फोट केला आहे. त्यांच्यावर हल्ला करणारे कार्यकर्ते हे मराठा समाजाचे नव्हते. तर बिगर मराठे होते. ते आपल्या राजकीय विरोधकांचे कार्यकर्ते होते, अशा दावा प्रकाश सोळंके यांनी केला. विशेष म्हणजे या 250 ते 300 समाजकंटकांपासून मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनीच आपल्याला वाचवले. त्यांच्यामुळेच आपला जीव वाचला, असे मोठे वक्तव्य प्रकाश सोळंके यांनी केला. माझ्या बंगल्यासमोर जो जमाव होता त्यामध्ये मराठा समाजाशिवाय इतर देखील माणसे होती. त्याचबरोबर जे अवैध धंदे करणारे आहेत, वाळू, गुटखा, हातभट्टी, धान्याचा काळाबाजार करणारे जे लोकं होते त्यांचासुद्धा समावेश त्या लोकांमध्ये होता. माझे 30 ते 35 वर्षांपासूनचे काही राजकीय विरोधक आहेत त्यांचे काही कार्यकर्ते त्या जमावात दिसत होते. त्यांच्या संस्थेत काम करणारे कर्मचारी आणि शिक्षक हे सुद्धा त्या जमावात होते, असे मोठे स्पष्टीकरण प्रकाश सोळंके यांनी केले.



या प्रकारातील साधारणपणे 200 ते 250 लोकं त्या जमावात होते, असे माझ्या लक्षात आले. हे 200 ते 250 लोकं माझ्या घरी पूर्ण तयारीने आली होती. त्यांच्याकडे शस्त्रही होती. कुऱ्हाडी होत्या, त्यांच्या सॅकमध्ये पेट्रोल बॉम्ब होते. मोठ्या प्रमाणात दगड होते. पूर्वनियोजित कट करुन हे लोके माझ्या घरावर दगडफेक करत होते. माझ्या घरात घुसून त्यांनी जाळपोळ केली. फर्निचरचे नुकसान केले, असा दावा प्रकाश सोळंके यांनी केला.

माझ्या तीन गाड्या जाळल्या. मला भेटायला आलेले कार्यकर्ते होते त्यांची गाडी जाळली. सात-आठ मोटरसायकल होत्या. त्यामध्ये पोलिसांच्याही मोटरसायकल होत्या. ते ज्या तयारीने आले होते ते पाहता त्यांचा डायरेक्ट हेतू दगडफेक, जाळपोळ बरोबरच माझ्या जीविताला हानी पोहोचावी, अशा दृष्टीने प्लॅनिंग करुन आले होते. त्या दृष्टीने ते घरामध्ये घुसून माझ्यापर्यंत हल्ला करण्यासाठी आले होते. पण मी घरातच एका ठिकाणी बसलो होतो, तिथे ते पोहोचू शकले नाहीत, अशी माहिती प्रकाश सोळंके यांनी दिली. आम्ही सीसीटीव्ही फुटेज पाहिले. त्या फुटेजमध्ये 200 ते 250 जणं दगडफेक करत होते. तर इतर आंदोलक या दगडफेकीला विरोध करत होते. ज्यांनी माझा जीव वाचवला ते सुद्धा मराठा समाजाचेच कार्यकर्ते होते. ज्यांनी मला संरक्षण दिलं ते मराठा समाजाचे कार्यकर्ते होते. त्यामुळे मी पोलीस प्रशासनाला सीसीटीव्हीचे फुटेज दिले आहेत. त्यामध्ये समाजकंटक, माझा राजकीय विरोध करणारे, माझे राजकीय विरोधक स्पष्टपणे दिसत आहेत. मी पोलिसांकडे मागणी केलीय की, सरसकट सर्वांना अटक न करता तुम्हाला कॅमेऱ्यात दगडफेक करताना जे दिसत आहेत त्यांनाच अटक करण्याची विनंती केली, असे प्रकाश सोळंके यांनी सांगितले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे 21 आरोपी भेटले आहेत. त्यापैकी 8 आरोपी हे मराठा व्यतिरिक्त आहेत. ते कोणत्या जाती-धर्माचे आहेत ते मला माहिती आहे, पण मला बोलायचं नाही, असे प्रकाश सोळंके यांनी सांगितले.

# चिखलीत पाच एकर जागेत गोशाळा; मोकाट जनावरांचा प्रश्न सुटणार

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** शहरात दिवसेंदिवस मोकाट जनावरांची संख्या वाढत असल्यामुळे गोशाळा असणे गरजेचे झाले आहे. शहरात ७०० मोकाट जनावरे असून यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली येथील सुमारे पाच एकर जागेत गो-संवर्धन केंद्र आणि गोशाळा सुरू करण्यात येणार आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वाढत असल्यामुळे रस्त्यावर फिरणाऱ्या गायी, बैल आदी गोवंशाची संख्या सुमारे ७०० च्या आसपास आहे. गोवंश शहरातील रस्त्यांवर पहायला मिळतात. जखमी झाल्यामुळे किंवा आजारी असल्यामुळे संबंधित गोवंशाला उपचाराची आवश्यकता असते. अनेकदा उपचाराअभावी मृत्यूचे प्रकार घडतात. मोकाट जनावरे रस्त्याच्या मध्यभागी बसून असतात. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि लहान-मोठे अपघाताच्या घटनाही वारंवार घडल्या आहेत. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून गोशाळा सुरू करण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. गोशाळा आणि गो संर्वधन व उपचार केंद्र सुरू केल्यास गोवंश वृद्धीच्या दृष्टीने हितकारक ठरणार आहे. त्यासाठी महापालिकेने सकारात्मक भूमिका घेत चिखलीत गो-शाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. चिखली, पाटीलनगर येथील इंद्रायणी नदीच्या शेजारी महापालिकेची पाच एकर जागा आहे. या जागेकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने गो शाळेचा प्रश्न प्रलंबित आहे. जागेसाठी पशुवैद्यकीय विभागाने नगररचना विभागाला पत्र देऊन जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. आता या प्रश्नी आमदार महेश लांडगे यांनी आयुक्तांबरोबर बैठक घेतल्याने रस्त्याचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.



# महावितरणच्या पथकास धक्काबुक्की

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वीजमीटर का बदलता असे म्हणत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणच्या अहिंसानगर शाखेचे सहायक अभियंता शशांक भेले हे बुधवारी कर्मचाऱ्यांसह कैलासनगर गल्ली नं.3 येथे वीजचोरीविरोधातील मोहीम राबवीत होते. यावेळी खांबावर लावलेले एका ग्राहकाचे मीटर बदलत असताना

## दोघांवर गुन्हा दाखल

सोनु गोरे पाटील तसेच कन्हैयालाल टाक यांचा मोठा मुलगा या दोघांनी सहाय्यक अभियंत भेले व त्यांच्यासोबतच्या कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणला. प्रधान तंत्रज्ञ अशोक काथरे यांच्या फिर्यादीवरून सोनू गोरे व कन्हैयालाल टाक यांचा मोठा मुलगा या दोघांवर जिन्सी पोलिस ठाण्यांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे

लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ,
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हें.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हें.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील. नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

## मार्ग मोकळा

आधुनिक केसरी

भिडेवाड्यासंदर्भातील स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका गुरुवारी न्यायालयाने फेटाळली. स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागला, याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त करत याचिकाकर्त्यांना दंड का करू नये, अशी विचारणा करतानाच एक महिन्यामध्ये जागा रिकामी करून ती महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाने रहिवाशांची याचिका फेटाळल्याने भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक होण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. भिडेवाड्यासंदर्भातील उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात रहिवाशी आणि व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर गुरुवारी न्यायमूर्ती ए. एस. बोपन्ना आणि पी. एस. नरसिम्हा यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागतो, ही बाब खेदजनक आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. महापालिकेच्या वतीने वरिष्ठ वकील माधवी दिवाण आणि अॅड. मकरंद आडकर यांनी बाजू मांडली. महापालिकेच्या विधी विभागाच्या प्रमुख अॅड. निशा चव्हाण, भूसंपादन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील, विशेष भूसपादन अधिकारी श्वेता दारूणकर, सहाय्यक वकील प्रणीव सटाले आणि शंतून आडकर यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न केले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेल्या बुधवार पेठेतील भिडे वाड्याच्या जागेच्या भूसंपादनाशी निगडीत उच्च न्यायालयात दीर्घ काळ प्रलंबित असलेल्या खटल्याचा निकाल पंधरा दिवसांपूर्वी महापालिकेच्या बाजूने लागला होता. त्यामुळे भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने महापालिका प्रशासनाकडून भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. तसेच भिडेवाडा स्मारकाचा कच्चा आराखडाही महापालिकेकडून तयार करण्यात आला होता. मात्र, स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने ही कामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी एका महिन्याच्या आत जागा मोकळी करून महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याची आणि स्मारकाचे काम रखडल्याबद्दल दंड का करू नये, अशी विचारणा याचिकाकर्त्यांना केल्याची माहिती निशा चव्हाण यांनी दिली. महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली त्या ठिकाणी स्मारक करावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. मात्र या वाड्यात असलेले रहिवासी आणि व्यावसायिकांनी या वाड्याच्या भूसंपादनाबदल्यात योग्य मोबदला मिळावा, यासाठी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. गेल्या १३ वर्षांत न्यायालयात त्यावर तब्बल ८० वेळा सुनावणी झाली होती. महापालिकेने भिडेवाडा ताब्यात घेऊन तेथे राष्ट्रीय स्मारक करावे, असा ठराव फेब्रुवारी २००६ मध्ये मुख्य सभेने केला होता. त्यानंतर जानेवारी २००८ मध्ये स्थायी समितीने त्यास मान्यता देऊन भूसंपादनाद्वारे ही जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता स्मारकाचा मार्गही मोकळा झाला आहे.

## आता तरी लोकप्रतिनिधी निवडून द्यावे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतीय लोकशाही जगात सर्वश्रेष्ठ आहे. भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने जनमानसात रूजली असती तर आज देश महासत्ता असता. परंतु हजारो वर्षांपासून विषमता निर्माण करून माणसाला प्राण्यापेक्षा हीन मानणाऱ्या किळसवाण्या संस्कृतीचे जतन येथे केले गेले. आणि विषमता, पाखंड, थोतांड, अंधविश्वास जोपासून माणसाला जे लोक माणूस मानत नव्हते अशा लोकांनी स्वतः ला श्रेष्ठ समजून घेऊन इतरांना माणसिक गुलाम करून हक्क अधिकारापासून व सर्वांगीण विकासासापासून दुर केले. जेथे माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते, माणसाला पाणी पिऊ देत नव्हते, माणसाच्या सावलीचा विटाळ व्हायचा, जेथे स्त्रियांना कमी लेखून बंधनात अडकले होते.**

जेथे शेती करणाऱ्यांना तुच्छ लेखले जायचे, शिक्षण नाकारले जायचे अशी व्यवस्था येथे प्रस्थापित असताना देशात समता प्रस्थापित करणे हे कल्पना शक्तीच्या बाहेरचे होते. परंतु बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान लिहण्याची संधी मिळाली आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ज्ञानाच्या जोरावर या संधीच सोनं करून देशातील प्रत्येक व्यक्तीला समान स्थान, समान हक्क, समान सन्मान देऊन हजारो वर्षांपासून चालत आलेली व्यवस्था उलथून टाकली. आणि देशाला जगातील सर्वश्रेष्ठ असे संविधान निर्माण करून प्रत्येक माणसाला विकासाचे व मानासन्माने रस्ते मोकळे करून दिले. संविधान रुपाने समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य हे कागदोपत्री देशात लागु झाले परंतु लोकांच्या डोक्यातील विषमतेची घाण तशीच होती. दुसरी गोष्ट म्हणजे विषमता, अंधविश्वास, पाखंड, थोतांड यावर ज्यांचे पोट भरले जात होते व ज्यांनी माणसाच्या सावलीचा विटाळ होतो ही निच शिकवण समाजात पेरली अशा लोकांसाठी संविधानाने अंकुशाचे काम केले. म्हणून निच मानसिकतेच्या लोकांनी जातीयतेचा आधार घेऊन संविधान सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचूच दिले नाही. आणि काही लोकांनी संविधानाची चुकिची मांडणी करून सर्वश्रेष्ठ संविधानाला दोष द्यायला सुरुवात केली. परंतु समता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विचार केला तर संविधानाने कोणत्याही लहानातील लहान घटकांवर देखील अन्याय होऊ दिला नाही. आणि भविष्यात देखील होऊ नये म्हणून लोकांनी लोकांचे प्रतिनिधी निवडून द्यावे व लोकप्रतिनिधी मार्फत लोकांनी लोकांच्या समस्या सोडवून आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा अशी सोय करून दिली. परंतु निवडणुकीच्या माध्यमातून देशात लोकप्रतिनिधी निवडले गेले नाही तर जाती धर्माचे व पक्षाचे प्रतिनिधी निवडून देण्यावर भर देण्यात आला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून संविधान न वाचणाऱ्यांची संख्या खुप आहे. विसमतेच्या जोरावर स्वतः चे पोट भरणारे लोक आता निवडून आलेल्या लोकांच्या जोरावर स्वतः ची मुळ व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत. आज आपण निवडणूकीच्या माध्यमातून जे उमेदवार निवडून देतो ते आपले नसतात च. ते पक्षाचे असतात. आणि देशातील राजकीय पक्षाकडे न्यायीक दृष्टिकोन व जनकल्याण नसल्याने जाती धर्माचा आधार घेऊन उमेदवार निवडून आणले जातात मुळात हेच लोकशाही साठी घातक आहे. आणि आजपर्यंत आपण जातीधर्माचा उमेदवार बघून उमेदवारांना निवडून दिले म्हणून लोकांच्या समस्या वाढल्या जर खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी निवडून दिले असते तर आज लोकांच्या समस्या राहील्या नसत्या. आज शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई या समस्यांनी देशात घुमाकुळ घालून सर्वसामान्य लोकांचे जिवन अवघड करून टाकले आहे. ज्यांना आपण आपल्या सेवेसाठी, आपल्या कामासाठी निवडून दिले त्यांनी स्वतः ची घरे भरून राजकीय पक्षाच्या बाजूने उभे राहले. जे लोकांच्या बाजुने उभे न राहता पक्षाच्या बाजुने उभे राहतात ते लोकप्रतिनीधी कसे? असा प्रश्न ही आमच्या डोक्यात येत नाही कारण निवडून देतांना च आपण जात धर्म बघून निवडून दिलेला असतो. लोकशाही मध्ये मताधिकार हा असा अधिकार आहे जेथे सरकार मध्ये कोण असेल आणि कोण नसेल हे फक्त जनताच ठरवु शकते. मग एकीकडे सर्वकाही जनता ठरवते आणि जनतेच्याच समस्या का सुटत नाहीत तर जनता जेव्हा उमेदवार निवडून देते तेव्हा तो आपल्या जातीचा धर्माचा आहे का याचा विचार करून निवडून देतात. शिक्षण, रोजगार, आरोग्य, हक्क अधिकार यावर काम करणाऱ्यांना जनता प्राधान्य देत नाही म्हणून या समस्या वाढत आहेत. जाती धर्माचे लोक निवडून देऊन बऱ्याच लोकांना आपल्या जातीचे लोक तेथे आहेत म्हणून समाधान वाटते. परंतु लोकांनी मत जरी जात बघून दिले



असेल पण निवडून आल्यावर ते जातीच्या लोकांचे पण काम करत नाहीत. उदाहरण जरी बघायचे झाले तर सध्या मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र भर आंदोलन होत आहेत. आमदार खासदार जातीने मराठा अनेक आहेत. जनता मराठा आरक्षणाची मागणी करत असताना या आमदार खासदार यांनी जनतेच्या बाजूने उभे राहणे आवश्यक असते. कारण जनतेने निवडून दिलेले आहे. परंतु हे मराठा आरक्षणासाठी जनतेच्या बाजूने न बोलता गप्प आहेत तर काही लोक राजकीय पक्षाची हमाली करताना दिसत आहेत. खरंच हे लोक मराठा समाजाचे प्रतिनिधी असते तर थोड तरी बोलले असते. दुसरी गोष्ट राजकीय नेते धार्मिक दंगली सदृश्य परिस्थिती निर्माण करून देतात मग तेथे धार्मिक दंगली होतात. दंगली झाल्यावर जे नेते दंगली साठी कारणीभूत आहेत ते तर गायब होतात पण आपल्याच धर्मातील तरुण धर्मासाठी रस्त्यावर उतरले, आणि पोलिसांकडून गुन्हे दाखल होत आहेत म्हणून जमानत घेण्यासाठी एकही आमदार खासदार समोर येत नाही अथवा धार्मिक दंगली मध्ये तरुणांना जमानत मिळाली म्हणून वकिलांची टिम तयार करत नाहीत. आपण सध्य परिस्थिती पाहली तर मराठा हेच कुणबी आहेत हे कोणीच नाकारू शकत नाही. कुणबी यांना ओबीसी मध्ये आरक्षण आहे. मराठा आरक्षणाच्या माध्यमातून ज्या मराठ्यांच्या कागदपत्रावर मराठा आहे त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे एवढी साधी मागणी आहे. नविन काहीच नाही. जे आहे तेच द्यायचे आहे. पण या साठी मोठ्या संख्येने मराठा आमदार खासदार असताना ही ते बाजु उचलून धरत नाहीत. म्हणजे ते जातीने जरी मराठा असतील तरीही ते प्रतिनिधी मराठ्यांचे नाहीत. असते तर काहीतरी बोलले असते. ही परिस्थिती सर्वत्रच आहे फक्त मराठा आरक्षण प्रश्न ज्वलंत आहे म्हणून उदाहरण घेतले आहे. बर हे मराठा आरक्षणावर एकही शब्द बोलत नाहीत पण कुणब्यांना कुणब्याचेच प्रमाणपत्र मिळावे म्हणून आंदोलन करणाऱ्या तरुणांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आमदार खासदार मराठा तरुणांवर गुन्हे दाखल करू नका एवढेही बोलायला तयार नसतील तर हे लोकांचे प्रतिनिधी नाहीत हेच सिद्ध होते. लोकप्रतिनिधी म्हणजे आपल्या मतदार संघातील प्रत्येक माणसाच्या समस्या लक्षात घेऊन वेळोवेळी त्या सभागृहात मांडून त्यावर तोडगा काढणारा व्यक्ती होय. आपल्या मतदार संघात शिक्षण, आरोग्य, रोजगार यांच्या सुविधा लोकांसाठी निर्माण करून वेळोवेळी पाठपुरावा करणारा होय. लोकप्रतिनिधी म्हणजे मतदार संघातील काही जनतेचा पालक असतो, लोकप्रतिनिधी राजकीय पक्षांच्या बाजुने नव्हे तर लोकांच्या बाजूने उभा राहतो. लोकप्रतिनिधी जात धर्म यावरून लोकांकडे जात नाहीत नसतो तर कर्म बघून लोक निवडून देत असतात. आज पर्यंत आपल्याला लोकशाही व लोकप्रतिनिधी यांची यांचे महत्त्व कळाले नाही. परंतु महाराष्ट्र पेटवायला मजबुर करायला लावणाऱ्यांना सत्तेतून बाहेर काढून लोकांचे कामे करणारे खरे लोकप्रतिनिधी सभागृहात व सत्तेत जाने आवश्यक आहे तरच लोकांच्या समस्या दुर होतील. काम करणारा व्यक्ती मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो तो जोपर्यंत निवडून येणार नाही तोपर्यंत लोकांच्या समस्या सभागृहात जाणार नाहीत. आणि ज्या दिवशी खऱ्या अर्थाने जात धर्म न बघता कर्म बघुन उमेदवार निवडला जाईल त्या दिवशी लोकांच्या समस्या सुटलेल्या असतील व लोकांची खऱ्या अर्थाने प्रगती व्हायला सुरवात होईल. आणि जनता मताधिकारा मुळे सर्व काही करू शकते हे जेवढे खरे आहे तेवढेच खरे हे ही आहे की ईव्हीएम मुळे मताची किंमत शुन्य झाली. आणि किंमत शुन्य झाल्यामुळे हे लोक लोकांच्या समस्येवर लक्ष न देता स्वतः चे घर भरून राजकीय पक्षाची लाचारी करतात. म्हणून एक लढा ईव्हीएम हटवू पेपर निवडून घेण्यासाठी होणे आवश्यक आहे. जर पेपरवर निवडून झाली तर लोकांच्या समस्या दुर होऊन खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी निवडून यायला सुरवात होईल. परंतु एक गोष्ट विसरून चालणार नाही ती म्हणजे मत हे जात धर्म बघुन नाही तर कर्म बघून दिले तरच खरे लोकप्रतिनिधी निवडून येतील.

## जीवनात घडण्यासाठी जोखिम स्वीकारलीच पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन घडलं पाहिजे हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते.पण यशाचा आरंभ रिस्क घेऊन यश मार्ग यशस्वी करता आला पाहिजे.जीवनात स्वतःला मजबूत ठेवता आलं पाहिजे त्याच बरोबर वेळ प्रसंग त्यानुरूप येणारी आव्हान स्वीकारायला हवी , जिद्द चिकाटी मेहनत करताना स्वतःलाउत्साहपूर्ण ठेवला तर आत्मविकस होऊन आत्मविश्वास बळकट होईल आणि जीवनातील आपली बहुतांश स्वप्न पुर्ण होतील या मध्ये शंका नाही पण त्यासाठी आपण रिस्क मात्र घेतलीच पाहिजे. बसल्या जागेवर स्वप्न पुर्ण होत नाहीत त्यासाठी जोखिमपूर्ण आव्हान स्वीकारलं पाहिजे.जीवनात रिस्क जोखिम याला घाबरून चालत नाही समस्यांना सकारात्मक घेतल पाहिजे.**

कोणत्याही प्रकारचा नव निर्माण होण्यासाठी आव्हान तर स्वीकारावाच लागत . आव्हान स्वीकारल तरच आपला आत्मविश्वास संजीवनी ठरतो अन्यथा आपल्या मध्ये असणार्या क्षमता निरर्थक निरूपयोगी ठरतात .जीवन हितार्थ अथवा जीवन यशस्वी होण्यासाठी रिस्क घेण गरजेचं असतं .यश मिळेल कि नाही मिळेल हा वेगळा विषय आहे पण आपला आत्मविश्वास वाढण्यासाठी त्याचा विकास होण्यासाठी त्याच बरोबर आत्मविकस होण्यासाठी रिस्क घेतली पाहिजे. जीवन यशस्वी करायचं असेल तर रिस्क घ्यावीच लागेल त्या पासुन पळ काढता येणार नाही. रिस्क घेतल्यानंतर आपला उत्साह हा चरणसिमेवर असला पाहिजे रिस्क आणि उत्साह एकत्रितपणे कार्यरत असतील तर यश नक्कीच मिळेल. प्रत्येक जीव हा जीवना विषयी स्वप्न बाळगून असतो. हेच स्वप्न उराशी बाळगून आपण प्रयत्न करत असतो.पण आपलं स्वप्न तडीस नेण्यासाठी रिस्क उत्साह आत्मविश्वास हे जीवनातील संजीवनी आहेत.जीवनातील आकांक्षा महत्वाकांक्षा पुर्णत्वास जाण्यासाठी हिच संजीवनी आपल्याला जीवनात कार्यरत असली पाहिजे. म्हणून दैनंदिन जीवनात उत्साह असला पाहिजे,सबळ आत्मविश्वासाह रिस्क घेण्याची मानसिकता हि निर्माण झाली पाहिजे. रिस्क उत्साह आत्मविश्वास हे जीवनातील नव संजीवनी आहेत. सृष्टी वरील सगळ्यात श्रेष्ठ असणार बळ म्हणजे आत्मविश्वास आणि याच आत्मविश्वासाची अग्नीपरिक्षा जेव्हा यशस्वी होते तेव्हा आत्मविश्वास हा संजीवनी ठरत असतो. मनातील अचेतन बळ हि शक्ति संजीवनी आहे ज्यामुळे असंभव संभव होऊ शकत. आत्मविश्वास हा प्रत्येकाच्यामध्ये ठासून भरलेलं असतो.पण जोपर्यंत आपण जोखिम पत्कारत नाहीत तोपर्यंत आपला आत्मविश्वास हा संजीवनी ठरत नाही. जीवनात आपण अनेक अशा अपेक्षा बाळगून



असतो पण बाळगलेल्या अशा अपेक्षा महत्वकांक्षा या पुढे घेऊन जाण्यासाठी यशस्वी होण्यासाठी रिस्क तर घ्यावीच लागते. विना रिस्क जीवन संभव नसतं. जीवनात यशस्वी होण्यासाठी रिस्क घेण आवश्यक आहे त्याच बरोबर प्रचंड उत्साह आणि आत्मविश्वास असला तरच घेतलेली रिस्क यशात परिवर्तित होत असते. एकंदरीत जीवन मुल्यमापन पाहिलं तर रिस्क, उत्साह, आत्मविश्वास, ही अमृत संजीवनी आहे. प्रगती, उत्थान उत्कर्ष झाला पाहिजे हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते. मार्ग रस्ते वेगवेगळे असले तरी सुद्धा यशाचा मार्ग सर होण्यासाठी उत्साह ही शक्ति प्रचंड मोठी भुमिका अदा करत असते. उत्साहमुळे आत्मबळ वृद्धिंगत होत असत आत्मबळ हे वृद्धिंगत झाल तर मग जगात अशक्य असं काहीच उरत नाही.आपण यशस्वी व्यक्तिच्या यशाकडे पाहतो पण यश मिळविण्यासाठी घेतलेल्या जेखीमीकड आपण पाहत नाही म्हणून यशाचा खरा संदर्भ आपल्याला लागतं नाही.जगात विना रिस्क कोणीही काही मिळवू शकत नाही म्हणून रिस्क हि घेतलीच पाहिजे फक्त जोखिम विचार पुर्वक पत्कारली तर यश हे हमखास मिळणारच.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कोविड योद्ध्यांना वापरा आणि हाकलून द्या ही शासनाची भूमिका

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयटकचे साखळी उपोषण सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय औरंगाबादयेथील 98 कथीत कंत्राटी कामगारांना कोविड योद्ध्यांना सेवेत सामाऊन घ्या या मागणीसाठी आजपासुन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात झाली.

जोपर्यंत कायम नोकरीचा आदेश मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरुच राहील असा निर्धार कामगारांनी व्यक्त केला. याबाबत असे की, कोव्हीड महामारीच्या दोन्हीही लाटेत ज्यांच्यामुळे शाकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) व जिल्हा प्रशासनाला मोठी मदत झाली, त्यांना काव्हीड योध्दा म्हणून घाटी प्रशासनाने प्रमाणपत्रही दिले. त्यांच्यासाठी टाळया-थाळया वाजवण्यात आल्या, दिवे विझवण्यात आले, पुष्प वृष्टी करण्यात आली, जेंव्हा कोव्हीड वार्डात जायला भिती वाटत होती, तेंव्हा वरील ९८ कथीत कंत्राटी सफाई कामगारांनी कोव्हीड रुग्णांची सुश्रुशा केली, वयोवृध्द रुग्णांचे डायपर बदलले, त्यांना पाणी, जेवण दिले, मृत्यू झालेल्या कोव्हीड रुग्णांचे पार्थीव शरीर व्यवस्थीतपणे अंत्य संस्कारासाठी रवाना केले. अशा प्राणांची बाजी लावणाऱ्या व कठीण परिस्थीतीत प्रशासनाला मदत करणाऱ्या कोव्हीड योद्यांना निराधार केले जात आहे. गरज सरो कोव्हीड योध्दा मरो, असा प्रकार सुरु आहे.




तेंव्हा विशेष बाब म्हणून, तसेच कोव्हीड काळातील या 98 कोव्हीड योद्यांच्या कामाचे साक्षीदार म्हणून आपण त्यांना सेवेत सामावुन घ्यावे, प्रत्येक कथीत कंत्राटी सफाई कामगारांच्या नावाने सरकारी तिजोरीतून दरमहा जवळपास १५,०००/- रुपये खर्च होतात, परंतू प्रत्यक्षात कामगारांच्या हातात जवळपास १० ,०००/- रुपये दरमहा एवढीच रक्कम मिळते. तेंव्हा सरकारी तिजोरीतून त्याच्या नावे बाहेर पडणारे दरमहा १५,०००/- रुपये एवढी तरी त्यांना थेट मिळावे, जेणेकरुन सरकारी तिजोरीवरही ताण येणार नाही व प्रशासनाला पडत्या काळात मदत करणा-या प्रामाणीक, कष्टाळू अशा 98 योद्यांच्या कामाची जाण ठेवली, असा देखील संदेश कामगारांमध्ये जाईल जिल्हाधिकार्यांमार्फत योग्य तो न्याय मिळेल अशी अपेक्षाही निवेदनात व्यक्त करण्यात आली.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर ) येथे जवळपास अधिकृत 1700 रुग्ण क्षमता असतांना त्यापेक्षा ३ पट. जास्त रुग्ण भरती होतात, रोज जवळपास रुग्ण व नातेवाईक मिळुन १०००० नागरीक घाटी हॉस्पीटलमध्ये येतात. सद्या स्थीतीत घाटी हॉस्पीटलमध्ये जवळपास १००० चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची आवश्यकता आहे. घाटीत रुग्णांना स्ट्रेचरवर व व्हील चेअरवर नेण्याचे काम नातेवाईकांनाच करावे लागते, १००० सफाई कामगारांची भरती केल्यास रुग्ण सेवा आणि स्वच्छता योग्य रितीने राखता येईल.घाटीतील अस्वच्छता हा कायम चर्चेचा विषय ठरत आहे पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे उपोषनार्थी ९८ सफाई कामगारांवर कामाचा ताण वाढत आहे, टीसीएस कंपनी मार्फत १४८ कामगारांच्या भर्तीचा निर्णय ९८ उपोषनार्थी कोव्हीड योद्यांवर अंन्याय करणारा आहे.

यापूर्वी घाटी प्रशासन, माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तसेच विद्यमान वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी जाहीर केल्याप्रमाणे, तसेच मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उपोषनार्थी ९८ कथीत कंत्राटी कामगार काव्हीड योद्यांना सेवेत सामाऊन घ्या, त्यानंतर उर्वरीत जागांसाठी भरती करावी अशी मागणी महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटक दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.
या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नाईलाजास्तव जिल्हाधिकारी कार्यालया समोर साखळी उपोषन सुरु करण्यात आले आहे.
लवकरात लवकर न्याय देऊन उपोषन संपवण्यास मदत करावी, सदर उपोषनार्थी रुग्ण सेवेस अडथळा न निर्माण करता, प्रशासनास सहकार्य करुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे रोज डयुटी करुन जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद समोर उपोषणात सहभागी होत आहेत. ही बाबही निवेदनात नमुद करण्यात आली आहे. यावेळी उपोषण मंडपात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी डॉ अरविंद लोखंडे यांनी निवेदन स्विकारले. या वेळी ॲड अभय टाकसाळ, कॉ. राजु हिवराळे, अरुणा कारभारी वाहुळ, बेबी काकडे, आरेफसाद शाकीर, जमीर शेख, विद्या हिवराळे, नंदा हिवराळे, कविता जोगदंड, शिलाबाई मुजमुले, निता भालेराव, चारू शिला जावळे, मनीषा हिवराळे, वंदना जोगदंडे, आम्रपाली जोगदंडे, दिपीका पंडित, माया हिवराळे, मनिषा सातपूते, संगिता सिरसाट, सोनी नितनवरे, मनिषा रातपुते, अजहर शेख, आनंद परघने, विजय नागोबा वनिता सातदिवे, प्रमिला रत्नपारखे यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाचा सर्वाधिक फटका एसटी बसला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यात मराठा आंदोलन उग्र झाले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या आठ दिवसांपासून उपोषण सुरु केले आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठी सर्वत्र साखळी उपोषण आणि रास्ता रोको आंदोलन केले जात आहे. त्याचवेळी आंदोलकांकडून लालपरीला लक्ष केले जात आहे. यामुळे राज्य परिवाहन मंडळ पुन्हा आर्थिक गर्तेत अडकला आहे. कोरोनाकाळानंतर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी आंदोलन केले होते. त्यामुळे एसटी महामंडळाचा आर्थिक डोलारा डळमळीत झाला होता. तो आता सुस्थितीत येत असताना पुन्हा मराठा आंदोलनाचा फटका एसटी महामंडळाला बसला आहे. या आंदोलनामुळे गेल्या काही दिवसांत एसटीचे सुमारे २० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होत होती. एसटीला चांगले दिवस येत होते. परंतु मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण मिळाले आहे. त्याचा थेट फटका हा एसटी महामंडळाला बसला आहे. एसटी महामंडळाचे आतापर्यंत सुमारे १७ ते २० कोटींचे नुकसान झाले आहे.
मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या तीव्र आंदोलनामुळे बसेसचे नुकसान होत आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला आगारातून जवळपास 132 रद्द करण्यात आल्या आहे. यामुळे येवला आगाराचे जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# मोदी सरकार जातनिहाय जनगणना व ५० % ची मर्यादा का हटवत नाही, हे नितेश राणेंनी पंतप्रधानांना विचारावे : अतुल लोंढे

## खर्गे, राहुल गांधी यांच्याबद्दल बोलण्याएवढी नितेश राणेंची 'उंची' व 'पात्रता' नाही

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आरक्षणप्रश्नावर काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट आहे आणि ती वेळोवेळी काँग्रेसने जाहीर केलेली आहे पण भाजपाचे आमदार नितेश राणे यांना त्याची माहिती नसावी म्हणून अज्ञानातून त्यांनी काँग्रेसची भूमिका विचारली आहे. देशभरातील विविध जातींच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर, 'जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवली पाहिजे', असा ठराव काँग्रेस पक्षाने हैदराबादच्या CWC बैठकीत केलेला आहे. आता नितेश राणे यांनीच सांगावे की केंद्रातील भाजपाचे नरेंद्र मोदी सरकार जातनिहाय जनगणना का करत नाही? व आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा का हटवत नाही? हे सांगावे असे प्रत्युत्तर प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिले आहे.
भाजपा आमदार नितेश राणेंनी मराठा आरक्षणासंदर्भात काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला होता त्याला उत्तर देताना काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे पुढे म्हणाले की,




देवेंद्र फडणविसांचे प्रवक्ते नितेश राणे यांनी आरक्षणावर त्यांची भूमिका काय आहे ते आधी समजून घ्यावे. फडणविसांच्या नादाला लागून ते मराठा आरक्षणाला विरोध करत असून यामुळे समाजाचे नुकसान होत आहे याचाही त्यांना विसर पडलेला दिसत आहे. पृथ्वीराज चव्हाण सरकार असताना २०१४ साली मराठा व मुस्लीम समाजाला आरक्षणाचा देण्याचा काँग्रेस आघाडी सराकरने निर्णय घेतला होता. यासाठी आमदार नितेश राणे यांचे पिताश्री श्रीमान नारायण राणे समिती नेमली होती, या समितीच्या अहवालावरच मराठा समाजाला आरक्षण दिले होते. या आरक्षणाविरोधात कोर्टात कोण गेले होते ? याची माहिती नितेश राणे यांनी त्यांचे वडील श्रीमान नारायण राणे यांच्याकडून आधी घ्यावी व नंतर काँग्रेसच्या भूमिकेवर बोलावे. काँग्रेस सरकारने दिलेले मराठा आरक्षण आमदार नितेश राणे यांचे सध्याचे मालक देवेंद्र फडणवीस यांच्या नाकर्तेपणामुळेच गेले आहे हे तपासून पहावे, त्याचा अभ्यास करावा. उगाच सकाळी सकाळी अर्धवट झोपेत काहीही बडबड करु नये.
आमदार नितेश राणे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, खासदार राहुल गांधी व प्रियंका गांधी यांच्या भूमिकेवरही प्रश्न विचारला आहे. राहुल गांधी यांनी मनोज जरांगे यांना फोन का केला नाही? ट्विट का केले नाही, अशी विचारणा नितेश राणे करत आहेत. राहुल गांधी हे देशाचे पंतप्रधान नाहीत तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, आरक्षणावर निर्णय केंद्र सरकारच्या हातात आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठा आरक्षणातील 'म' तरी काढला का ? पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शिर्डीत आले होते त्यावेळी ते जरांगे पाटील यांना आंतरावली सराटी येथे जाऊन का भेटले नाहीत? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आता राहुल गांधी पंतप्रधान असते तर जरांगे पाटील यांना उपोषण करावेच लागले नसते. मल्लिकार्जून खर्गे, राहुल गांधी व प्रियंका गांधी यांच्याबद्दल बोलण्याची कुवत, उंची व पात्रता नितेश राणे यांची नाही. त्यांनी काँग्रेस पक्ष, काँग्रेस पक्षाचे नेते यांच्याबद्दल बोलताना अभ्यास करुन, योग्य माहिती घेऊन बोलावे, अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही अतुल लोंढे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र Business Katta












# स्थल-कालाशी जोडलेल्या आठवणींचा कोलाज



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मानवी मनाच्या एका स्वाभाविक प्रवृत्तीतून प्रवासवर्णनपर लेखन होत असते.आपण पाहिलेला प्रदेश, तेथील लोकजीवन, निसर्ग, प्रवासातील अनुभव, सुख- दुःखाचे प्रसंग इतरांना सांगावेत, आपल्या आनंदामध्ये इतरांना सहभागी करून घ्यावे, ह्या स्वाभाविक प्रवृत्तीतूनच हे लेखन होते. प्रवासवर्णन हा ललित गद्यात समाविष्ट होणारा वाङ्मयप्रकार आहे. मराठी साहित्यात अनेक प्रवासवर्णनपर पुस्तके लिहिली गेली. पण स्थलवर्णनपर लेखन फार कमी आढळते.**

कोणत्याही प्रवासवर्णनातून जागवणारा प्रदेश, तेथील माणसे, भूगोल, इतिहास, धर्म, राजकारण, संस्कृती, राजकारण, अर्थकारण व सामाजिक जीवन या सर्वांतून जाणवत राहतो. ज्येष्ठ लेखक, समीक्षक डॉ. अनंत देशमुख यांचे 'स्थानपोथी' हे पुस्तक त्या अर्थाने वेगळे आहे. या पुस्तकात वेगवेगळ्या निमित्ताने झालेल्या स्थलांतरीय कारणामुळे ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य केले, तेथील आठवणी आणि अनुभवांचा नितळ आणि पारदर्शी गोफ विणला आहे. 'स्थानपोथी' नावाच्या ग्रंथाचा उल्लेख महानुभाव संप्रदायात आढळतो. पंथीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे, या पुस्तकाचे शीर्षक वाचताच या नावाचे स्मरण झाले. 'ओ अमेरिका' या प्रवासवर्णनपर पुस्तकानंतरचं ललितलेखनाचं हे पुस्तकात लेखकांनी मनात घर करून राहिलेल्या आठवणींना उजाळा दिला आहे. शिक्षण, नोकरी किंवा विविध कारणांमुळे प्रवास करून दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर त्या परिसराशी, निसर्गाशी समरस होताना, तेथे सामावून घेताना लेखक कुठेही तक्रार करताना दिसत नाहीत. पाण्यात जशी साखर मिसळते तसेच ते स्वतःला त्या वातावरणात एकरूप करण्याचा प्रयत्न करत होते. 'स्थानपोथी' या पुस्तकात २१ ललितलेख समाविष्ट असून त्या ठराविक कालावधीतील अविस्मरणीय क्षणचित्रे यात रेखाटली आहेत. ललितलेखनात एक मुक्तपणा असतो, त्यामुळे या स्थलवर्णनपर आठवणीं सांगताना एका मनमुक्त फुलपाखराप्रमाणे प्रवाहपर होऊन स्वैर बागडत आहेत. एखाद्या लहान मुलाला खेळताना जसा आनंद होतो तशी निरागसता या लेखनात जाणवते. प्रथमपुरुषी निवेदन, ओघवती आणि प्रवाही भाषाशैली , विस्तृत आणि सखोल माहिती सोबतच व्यक्तिदर्शन या घटकांमुळे हे ललितलेखन जुजबी माहिती देणारे मार्गदर्शक न होता त्या त्या स्थळाचं पूर्वरूपसुद्धा दर्शवते.

या पुस्तकात बागदांडे, सारळ, अलिबाग, जैतापूर, रत्नागिरी, मुंबई, भोगवे, चिपळूण, श्रीवर्धन, कासपठार, पुणे, बोरघाट, वडगाव हवेली, दार्जिलिंग, गंगटोक, लाचुंग आणि लेक फॉरेस्ट या परिसरातील अनेकांगी गोष्टी ज्या संवेदनशील मनाला भावल्या, त्या लेखकाने व्यक्त केल्या आहेत. लेखकाच्या चौफेर नजरेने टिपलेल्या ठळक घटनांची नोंद यात आहे.

लेखकाचे बालपण हे बागदांडे, सारळ या ठिकाणी गेले त्यामुळे साहजिकच तेथील निसर्ग, समुद्राची गाज याचे त्यांना विशेष आकर्षण. अलिबागमधील आठवणीं व्यक्त करताना त्यांनी आई - बाबा , आपली भावंड, वडिलांची नोकरी, घर सांभाळणारी आई, आजुबाजुचं वातावरण, सामाजिक जीवन, दारावर येणारे आगन्तुक, पोतराज, भिक्षेकरी आणि गावातील विविध वास्तू, तेथील रूढी - परंपरा आणि त्याचा आपल्या मनावर असलेला प्रभाव लेखकाने सविस्तरपणे मांडले आहे. ज्या काळात पायाभूत सोयी - सुविधा उपलब्ध नव्हत्या, वीज, रस्ते, प्रवासाची साधने, संपर्कसाधने नव्हती तेव्हाचे जीवन कसे होते, याची प्रचिती या लेखांद्वारे येते. या पुस्तकात लेखकाने जाणीवपूर्वक तत्कालीन स्त्रियांचे जीवन उलगडून दाखवले आहे.यावरून तेव्हा स्त्रियांचं भावविश्व कसे होते, हे समजते.

पुस्तकाच्या सुरुवातीला ठाणे शहराची सफर घडते. ठाणे हे आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण शहर आहे. त्या दृष्टिने ठाण्याची वैशिष्ट्ये यात दिलेली आहेत. सोबतच ठाणे शहराची जडणघडण कशी झाली, त्याचा इतिहास काय आहे, या शहराला मोठमोठ्या व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभला, त्यांची माहिती आणि त्या व्यक्तीचे योगदान या गोष्टी मांडल्या आहेत.

बालपणीच्या आठवणीं वाचताना वाचकही त्यात रमुन जातो. शाळा, शाळेच्या आठवणीं, मित्र आणि निसर्ग यात रमणारे लेखक पाहिले की आपण मनाने भूतकाळात विसावतो. काका आणि मावशी यांनी केलेले पुत्रव्रत प्रेम याविषयी लेखक सातत्यानं उल्लेख करतात तसेच वडिलांच्या कामाचे स्वरूप, त्यांचा स्वभाव आणि आवडीनिवडी याविषयी लेखक भरभरून व्यक्त होतात. हे पुस्तक वाचताना मला प्रकर्षाने जाणवलं ते, लेखकाचे निसर्गाप्रति असणारे आकर्षक आणि कृतज्ञ भाव. निसर्गातील नदी, समुद्र , झाडे- झुडुपे , पाने, फुले, त्यांचे रंग, त्यांचं फूलणं - कोमेजणं या सगळ्या घटना संवेदनशीलतेने समजून घेणारे लेखक विलक्षण निसर्गप्रेमी आहेत. एके ठिकाणी लेखक म्हणतात, 'भेंडीचं झाड तर कसही वाढायचं. ते नेहमीच उपेक्षित राहिलेलं असायचं. आम्ही मुलं त्याची पसरट पाने तोडून पिपाण्या बनवित असू' विविध फळझाडे, फुलझाडे त्यांचे रंग या विषयीची त्यांची आवड पुस्तक वाचताना जाणवते. त्यांनी बऱ्याच झाडांची लागवड करून त्यांना जपले आहे. निसर्गाचे अद्वितीय रूप आपल्या आजुबाजुला आहे, ते सौंदर्य पाहण्याची दृष्टी असायला हवी. झाडांमध्येही संवेदनशील भाव असतात, त्यानाही वेदना होतात, झाडांमधील सजीवता विसरत चाललेल्या पिढीला लेखकाने वृक्षलागवडीची प्रेरणा दिली आहे. लेखक म्हणतात, 'आपल्या सभोवतालाकडं आपण सजगतेनं पाहिलं तर निसर्गाची स्पंदने आपल्याला जाणवू लागतात. आपल्या पंचेन्द्रियांना ती सतत खुणावत असतात.'




जैतापुर येथील गणेशोत्सवाच्या आठवणीं सोबतच कोकणातील गणेशोत्सव, तेथील प्रसन्न वातावरण, सामाजिक सलोखा , त्या ऋतुत निसर्गाचे पालटलेले रुप सगळ्यांचे अत्यंत सुंदर वर्णन यात आढळते. लेखकाने इतक्या बारकाईने आणि सविस्तर प्रत्येक गोष्ट, प्रसंग वर्णन केले आहे, की त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्ती, आकलन आणि ते मांडण्याची हातोटी कमालीची आहे. रत्नागिरीतील कॉलेजमध्ये प्रवेश, तारुण्य, लाभलेले मित्र आणि गमतीजमती हळूच ओठांवर हसू आणतात. यासोबतच त्यांच्या मनावर होणारे साहित्यविषयक संस्कार , लाभलेला मित्रपरिवार, प्रबोधक कार्यक्रम आणि त्यातील सहभाग यामुळे हळूहळू त्यांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत गेले, तो प्रवासही यात गड्द होत जातो. वडगाव हवेली येथील चिटणीस वाड्याचं वर्णन इतकं सुरेख केलेले आहे की डोळ्यांसमोर प्रतिमा उभी राहते. मुंबईचं वातावरण, गुहागरचा समुद्र, कराड येथील नद्या, कासपठाराचे विहंगम दर्शन तसेच पुण्यातील बावधन परिसरातील आदर्श अशा वृद्धाश्रमाची अगदी विस्तृत माहिती वाचून बऱ्याच ठिकाणाचे महत्त्व, तेथील खास आकर्षणं कळत जाते. गंगटोक, लाचुंग, दार्जिलिंग, अमेरिका इत्यादी ठिकाणच्या वास्तव्यात आलेले अनुभव त्या शहराची ओळख करून देतात.

लेखकाच्या सजग दृष्टी आणि सकारात्मक विचारांमुळे कशातही तुम्ही सौंदर्य अनुभवू शकता, कारण या पुस्तकात लेखकाने काजव्यासारख्या निरुपद्रवी प्राण्याच्या प्रकाशमानतेची दखल घेतात पण हे काजवे कवीमनाचे विषय होत नाहीत, हा विचारही प्रगट करतात.

एकूण या आठवणीं वाचताना असे वाटते, की अरेच्या आपण या दृष्टिकोनातून विचार केला असता तर ? आपण जेथे वास्तव्य करतो किंवा काही काळासाठी ठराविक ठिकाणी जातो, तेथे आजुबाजुच्या घटकांशी एक तरल नातं तयार होतं. अगदी लहान- सहान घटकांशी आपण जोडले जातो. काही आठवणीं सुखावह असतात तर काही वेदनादायी असतात. प्रत्येक क्षणाला अनेक आठवणी तयार होत असतात, त्यातल्या काही क्षण असे असतात जे मनावर खोल रुजतात. आणि या रूजलेल्या आठवणींचं बीज जेव्हा लेखणीतून तरारुन वर येते, तो खरा हृदयंगम सोहळा असतो. तो हृदयंगम सोहळा 'स्थानपोथी' मध्ये नक्की अनुभवा !

**( स्थानपोथी - ललितलेखसंग्रह / लेखक : डॉ. अनंत देशमुख / प्रकाशक : कृष्णा प्रकाशन / मूल्य : २३० रुपये )**

# दुष्काळग्रस्तांना दिलासा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या मागे लागलेले दुष्काळाचे दुष्चक्र काही केल्या संपायचे नाव घेत नाही. मागील दोन तीन वर्षात वरून राजाने आपल्यावर कृपा केल्याने हे दुष्चक्र थांबले होते मात्र यावर्षी पुन्हा वरून राजाची वक्रदृष्टी महाराष्ट्रावर झाली आणि राज्य पुन्हा दुष्काळाच्या छायेत आले. राज्यात यावर्षी सरासरीपेक्षा कितीतरी कमी पाऊस झाला. कोकण विभाग वगळता राज्यातील इतर सर्व प्रशासकीय विभाग तहानलेलेच राहिले. काही गावात तर सरासरीच्या दहा टक्के इतकाही पाऊस झाला नाही.**

राज्यातील तब्बल ४० तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. सांगली, सातारा, जालना, बीड पुणे या जिल्ह्यात पडणाऱ्या पावसात ४० टक्क्यांहून अधिक तूट निर्माण झाली परिणामी या जील्हातील तालुक्यातील पिके तर वायाच गेलीच पण त्या तालुक्यातील लोकांना पिण्याचे पाणी मिळणेही मुश्कील झाले. आज नोव्हेंबर मध्येच जर तिथे ही अवस्था असेल तर उन्हाळ्यात काय होईल याचा विचार केला तर अंगावर काटे येतात. केवळ हेच ४० तालुके नाहीत तर अनेक तालुके दुष्काळग्रस्त आहेत या सर्व तालुक्यातील नागरिक देखील आमच्या तालुक्यात दुष्काळ जाहीर करून आम्हाला सरकारने दिलासा द्यावा अशी मागणी करत आहेत. सरकारला वारंवार मागणी करूनही सरकार दुष्काळ जाहीर करत नसल्याने राज्यातील नागरिकांच्या मनात नाराजीची भावना निर्माण होत होती. सरकारने दुष्काळ जाहीर करून आम्हाला दिलासा द्यावा अशी वारंवार मागणी केल्याने अखेर सरकारने राज्यातील ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारने राज्यातील ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करून राज्यातील नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले याबद्दल सरकारचे मनापासून अभिनंदन करायला हवे. सरकारने ४० तालुक्यातच दुष्काळ जाहीर केल्याने इतर तालुक्यातील नागरिकही आमच्या तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करत आहे अर्थात त्यांची मागणी देखील योग्यच आहे मात्र पावसाळ्यात पुरेसा पाऊस न होणे, ऑगस्टमध्ये पावसाचा खंड, उपलब्ध भूजलाची कमतरता, जमिनीतील ओलावा, पेरणीखालील क्षेत्र आणि पेरण्यांची स्थिती याचा विचार करून सरकारने दुष्काळ जाहीर केला. भविष्यात उर्वरित तालुक्यात देखील दुष्काळ जाहीर होऊ शकतो. दुष्काळ जाहीर झाल्याने आता या तालुक्यांना सरकारची योग्य ती मदत मिळेल त्यामुळे या तालुक्यातील नागरिकांना दुष्काळाशी दोन हात करणे सोपे जाईल. राज्यातील ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करून नागरिकांना दिलासा दिल्याबद्दल सरकारचे मनापासून आभार!



# संयुक्त राष्ट्र संघाचा युद्धबंदीचा प्रस्ताव योग्यच

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)** हल्याचा निषेध केला. यावेळी तुर्कीचे राष्ट्रपती तैयप एर्दोगन म्हणाले की इस्रायल हा वर्चस्ववादी देश आहे. हमास हा दहशतवादी गट नसुन ते स्वतंत्र सैनिक आहेत यावरून स्पष्ट होते की तुर्की आतंकवाद्यांना व आतंवादी संघटनांना खुली मदत करीत आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या निशाण्यावर सर्वप्रथम आतंवादी संघटना व त्यांचे मदतगार देश का येत नाही? याचाही विचार संयुक्त राष्ट्र संघाने करण्याची गरज आहे.आजही हमास आतंकवादी इस्रायलची राजधानी तेल अविव वर मोठ्या प्रमाणात हल्ले करीतच आहे. या हल्ल्यांना सुध्दा संयुक्त राष्ट्रांनी विसरू नये असे मला वाटते. आजही इस्रायलमध्ये अनेक नागरिक जखमी अवस्थेत आहेत. त्यामुळे कोणतेही युद्ध असो ते विनाशाकडे नेणारेच असते.त्यामुळे संयुक्त राष्ट्रांनी व संयुक्त राष्ट्र संघटनेच्या देशांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की इस्रायलवर पहिला हल्ला कोणी केला.ज्यानी पहिला हल्ला केला तोच हत्यांचा मुख्य दोषी आहे.त्यामुळे इस्रायलच्या निष्पाप लोकांचा बळी हमास आतंकवाद्यांनी घेतला. त्यामुळे इस्रायलने शपथ घेतली आहे की हमासला संपविल्याशिवाय स्वस्त बसनार नाही. याकरीता संयुक्त राष्ट्रांनी दोन्ही बाजूंचे गांभिर्य लक्षात घेतले पाहिजे.गाझा पट्टीत सुरू असलेला अमानुष नरसंहार थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत मानवतावादी दृष्टिकोनातून युद्धबंदीसाठी मांडलेला ठराव प्रचंड बहुमताने मंजूर करण्यात आला. मात्र ब्रिटन, कॅनडा, जर्मनीसह ४५ देश मतदानापासून दूर रहाले यात भारताचाही समावेश आहे. परंतु भारताने मतदानापासून दूर राहण्याच्या निर्णयाचे स्पष्टीकरण देतांना भारताने सांगितले की या ठरावात हमासचा उल्लेख नाही आणि संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादाविरुद्ध स्पष्ट संदेश देण्याची गरज आहे. कोणताही दहशतवाद हानिकारक आहे त्यामुळे दहशतवाद्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम सर्वप्रथम संयुक्त राष्ट्रांनी करायला हवे. कारण हमासने इस्रायलवर हल्ला करून मोठी जखम केली आहे व त्यावर मीठ चोळण्याचे शेजारच्या आतंवादी संघटना व संघटनांचे मदतगार इराण, तुर्की सारखे अनेक देश करीत आहे. यावरसुध्दा संयुक्त राष्ट्र संघाने लगाम कसायला हवी. सध्या हमास-इस्त्रायल संघर्ष सिमित रहाले नसुन याचा परिणाम भारतावर सुध्दा झाला आहे. कतारमध्ये एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या भारताच्या आठ नौदल अधिकाऱ्यांना कतारमधील एका कनिष्ठ न्यायालयाने मृत्यू दंडाची (फाशीची) शिक्षा ठोठावली आहे. कतारमधील यंत्रणेने त्यांना ३० ऑगस्ट २०२२ रोजी अटक केली होती.परंतु महत्वाचे म्हणजे कतार हा हमास आतंकवादी संघटनेचा हीमायती देश आहे.अशा परिस्थितीत हमास आतंकवाद्यांच्या विरोधात भारताने इस्रायलला खुले समर्थन केले आहे.त्यामुळे कतार आगबबुला झालेला आहे व भारतीय आठ नौदल अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा ठोठावली आहे.फाशीची रद्द करण्यासाठी भारताचे कुटनिती प्रयत्न सुरू आहेत.आतंकवाद्यांचा सफाया व्हावा व युद्ध लवकरात लवकर थांबावे हिच अपेक्षा.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# भारतीय जनतेच्या मनात, शिक्षकांचे आदराचे स्थान!



बबन गुळवे
उमरगा, मो.९७३०९३९७३२


आधुनिक केसरी

**इप्सॉस ग्लोबल ट्रस्ट वर्दीनेस इंडेक्स २०२३ चा जागतिक सर्वे नुकताच जाहीर करण्यात आला आहे.संपूर्ण जगातील जनतेने सर्वात जास्त डॉक्टरांवर विश्वास दाखवला आहे.आणि भारतीय जनतेने इतर नोकरदारांच्या तुलनेत सर्वात जास्त विश्वासू म्हणून शिक्षकांची निवड केली आहे. भारतीयांनी सर्वात जास्त विश्वासू म्हणून शिक्षकांची निवड केलीय ही समस्त शिक्षकांसाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.परंतु, शिक्षकांनी हुरळून न जाता आणखी जास्त चांगले व नवीन उमेदीने शैक्षणिक कार्य करीत राहावे. प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत भारतीय शिक्षकांनी ज्ञानदानाचे,विद्यार्थी घडविण्याचे व समाजाला दिशा दाखवण्याचे अथकपणे जे पवित्र कार्य केले आहे ते खरोखर अभिमानास्पद व वंदनीय आहे.**

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी व मागासवर्गीयांसाठी भारतात शिक्षण सुरू केले. तेव्हापासून आजपर्यंत शिक्षक व शिक्षिका भारतात ज्ञान देण्याचे प्रभावी कार्य निरंतरपणे करत आहेत. महात्मा फुले,सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील,साने गुरुजी यांनी भारतात शिक्षणाचा आणि शिक्षकी पेशाचा पाया भक्कम केला तो आजही तसाच टिकून आहे शिक्षक आणि प्राध्यापक आजही शिक्षकी पेशाशी एकनिष्ठ आहेत आपले कर्तव्य चांगले बजावतात.परंतु, खेदाची बाब अशी की समाजातील काही लोक शिक्षकांना नावे ठेवतात, शिक्षकांचा अनादर करतात आणि शिक्षकांच्या पगाराबद्दल खोचक भाषेत बोलतात. याबद्दल शिक्षकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. कारण काही शिक्षकांची अकार्यक्षमता, चारित्र्य व वर्तन हे खटकणारे असते.पण हे ही लक्षात घेतले पाहिजे की सगळेच शिक्षक तसे नसतात. भारतातील बहुतांश शिक्षक हे कर्तव्यदक्ष, कार्यक्षम, निर्व्यसनी, चारित्र्यवान असेच आहेत. देशाची भावी पिढी सुदृढ आणि निकोप विचारांची घडविण्याचे कार्य शिक्षक अथकपणे करत असतात. कोरोनाच्या जीवघेण्या साथ रोगात शिक्षकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून अनेक अशैक्षणिक कामे आनंदाने केली आहेत हे विसरून चालणार नाही. आजही सगळे शिक्षक असंख्य अशैक्षणिक कामे पार पाडून न चुकता वर्गात जाऊन अध्यापन करतात,नेमून दिलेला अभ्यासक्रम शिकवतात. अशैक्षणिक कामांना वैतागून 'आम्हाला फक्त शिकवू द्या' ही मोहीम शिक्षकांनी सुरू केली आहे.

प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्राचार्य ना.य.डोळे, रा.रं. बोराडे, जनार्दन वाघमारे आणि अनिरुद्ध जाधव यांनी शिक्षण क्षेत्रात अलौकिक कार्य केले. त्यांचा आदर्श घेऊन आम्ही शिक्षक अध्यापनाचे कार्य करत आहोत.

आमच्या शालेय जीवनात आम्हाला एकसे बढकर एक असे गुणवान शिक्षक लाभले होते. बंकटराव गरड,गणेशराव गुळवे गुरुजी, अप्पाराव लोहारे,विश्वनाथ चलवाड, माधव कांडमगिरे, वाय.एम.पाटील, संभाजी परगे, अनंत बोरोळे, डी. आर. सोमवंशी, आर.एल. सोमवंशी सर या व इतर कर्तव्यदक्ष शिक्षकांनी आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन करत आम्हाला घडविले आणि आम्ही त्यांचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रात वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहोत. सांगायचा मुद्दा हा की शिक्षकच विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य करु शकतात. समाजाला व देशाला दिशा दाखवण्याचे कामही शिक्षकच करत असतात. आजही ग्रामीण भागात शिक्षकांचे समाजातील स्थान आदराचे आहे.आणि म्हणून आजही समस्त भारतीय जनतेने शिक्षकांची विश्वासू म्हणून निवड केली आहे. हा सर्व शिक्षकांचा सन्मान आहे.तेव्हा यापुढील काळातही



आपण सर्व शिक्षकांनी मिळून असेच प्रभावी कार्य करत राहू आणि देशाचा मान सन्मान वाढवू.

# कांदा रडवतो म्हणे..!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**पायात काटा रूतल्या नंतर होताऱ्या वेदनेने डोळ्यात पाणी येते, लग्न होऊन मुलगी सासरी जाताना माहेरच्या सर्व लोकांच्या डोळ्यात पाणी येते, कोणी नातेवाईकचा मृत्यू झाला की, लगेच डोळ्यात पाणी येते व कोणी वैरी मरण पावला असेल तरी शेवटी डोळ्यात पाणी येते, आनंदाच्या क्षणी सुद्धा डोळ्यात पाणी येते अशा बऱ्याच गोष्टी आहेत की, ते ऐकून, बघून डोळ्यात पाणी येते त्यातच कांदा चिरताना मात्र दररोज डोळ्यात पाणी येते. पण, जो जगाचा पोशिंदा आहे त्याकडे बघून मात्र कोणाच्याही डोळ्यात पाणी येत नाही.**

मग कांदा असो किंवा कोणतेही पीक घेऊन मोठ्या कष्टाने जगाला वर्षभर पोसत असते पण, जेव्हा तो अडचणीत सापडलेला असते, गळफास घेऊन आत्महत्या करते त्यावेळी का बरं कोणाच्या डोळ्यात पाणी येत नाही....? आणि का बरं त्याच्या मदतीला कोणी लावून जात नाही...? म्हणजेच त्याच्या विषयी आपुलकी नसावी फक्त त्याच्या भावमलात वाढ झाली की, मात्र डोळ्यात पाणी येते, आपोआप ओठावर शब्द येतात, कानाला ऐकू येतो, अन् मालात भाववाढ झाली की,त्या विषयावर चर्चा करण्यासाठी मात्र भरपूर वेळ मिळत असतो खरंच हे किती विचित्र आहे...?

मागे गेल्या काही महिन्यात टोमॅटोचे भाव का वाढले होते सर्वांचे धाबे दणाणले होते तसेच आज सुद्धा कांद्याचे भाव का वाढले अन् सर्वांच्या डोळ्यात पाणी येऊ लागले असेच पाणी जर त्या जगाच्या पोशिंद्याची परिस्थिती पाहून आले तर त्याला गळफासात अडकण्याची वेळ येणार नाही व दुःखाचे दिवस काढावे लागणार नाही पण, तेवढी वेळ कोणाकडे आहे...? आज बळीराजाची परिस्थिती सर्वात बिकट आहे जलसाठे भरपूर असताना सुद्धा त्याचे पीक पाण्याविना मरत आहे कारण दर महिन्याला लाख पगार त्याला कोणी देत नाही, पेंन्शन तर नाहीच त्याच्या पाशी मोठा होलसेल धंदा नाही तरीही रात्रंदिवस अफाट कष्ट करून जगत असतो ह्या महापुरूषाला कोणी ओळखावे व त्याला कोणी साथ द्यावे...? त्याच्या मदतीला धावून येणारा कधी जन्म घेईल ...? की,नाही हे निश्चित सांगता येत नाही म्हणून तर आज त्याला कोणीही मदत करणारा दिसत नाही. त्याला मदत करण्यासाठी किंवा त्याला न्याय मिळवून देण्यासाठी, आंदोलन करण्यासाठी जर कोणाकडे वेळ नसेल तर त्याच्या झालेल्या मालाच्या भाव वाढी विषयी बोलण्याचा कोणालाही अधिकार नाही कारण बळीराजा कोणाचा गुलाम नाही, नौकर नाही तो जगाचा पोशिंदा आहे. भलेही पदवी पुरता मर्यादित असेल तरी तो,महापुरुषच आहे म्हणून तर त्याला जिंकण्याची कोणात ताकद नसल्यामुळे फक्त पाठीमागेच त्याला बोलत असतात समोर बोलण्यासाठी हिंमत असावी लागते. ती,हिंमत नसल्यामुळे आज जो,तो म्हणत आहे की,कांद्याचे भाव वाढले,घेणे होणार नाही एकदा त्या गोर गरींबांकडे,रंजल्या गांजल्याकडे बघावे थोडे दिवसासाठी टोमॅटोमध्ये भाववाढ झाली होती तरी त्यांचे धाबे दणाणले नव्हते व आज कांद्याचे भाव वाढले तरी दहा लोकात ते डिंडोरी पिटताना दिसत नाही मग गरीब कोण आहे व खरा श्रीमंत कोण आहे....? आजच नाही तर येणाऱ्या प्रत्येक दिवसात बळीराजाच्या प्रत्येक मालात भाववाढ झाली पाहिजे. बळीराजा जगाला कळला पाहिजे



जो, पर्यंत बळीराजाच्या मालाला पाहिजे तेवढा भाव मिळत नाही तो, पर्यंत बळीराजाचा विकास होणार नाही म्हणून आज खऱ्या अर्थाने बळीराजाचा विकास होणे गरेजेचे नाही तर काळाची गरज आहे. कारण बळीराजा स्वार्थी नाही, कोणाकडून लाच घेत नाही, बेईमानी करत नाही फसवणूक करत नाही, त्याच्या शेतात पीक पाण्याविना मदत असेल तरी दारोदारी जाऊन भीक मागत नाही कारण आधीच त्याला माहीत असते की, माझा कोणीही वाली नाही म्हणून तो, येणाऱ्या प्रत्येक संकटांचा सामना करून जगत असतो हे, त्याचे वास्तविक जगणे पाहून सुध्दा आंधळे, बहिरे,मुके होऊन जातात मग तो, कोणाला भीक मागायला जाण्याचा विचार करेल ...? बळीराजा कधीच जगाला कळला नाही आणि समोर करायला हवा म्हणून त्याच्या मालाला तेवढाच भाव मिळाला पाहिजे घेणारे ते,घेतील ज्याच्याकडे अफाट धनसंपत्ती असेल ते,निंदाच करत राहतील हे, त्यांचे विचार आहेत कारण बळीराजाच्या निंदाच करू शकतात मदत मात्र करू शकत नाही म्हणून आज म्हणतात की,कांद्याचे भाव वाढल्यामुळे डोळ्यात पाणी येते. म्हणून बळीराजाने सुद्धा हार न मानता मनात कोणतेही नकारात्मक विचार न आणता आधी जगण्याचा प्रयत्न करायला पाहिजे एक दिवस बळीराजाचे राज्य येईल दिवसं प्रत्येकांचे निघत असतात हे,सदैव लक्षात असू द्यावे शासनाने सुद्धा बळीराजाच्या विषयी विचार करावे कारण तोही मतदान करत असतो बळीराजा जगाचा पोशिंदा आहे तो, आता कळलाच पाहिजे.

# तुझं गावचं नाही का तीर्थ ?



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**आपल्या भजनांचा आणि कीर्तनांच्या माध्यमातून मानव जीवनात 'सत्यम शिवम् सुंदरम्' ही जीवनमुल्ये रुजविणारे महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाच्या सर्व स्तरात एकात्मता प्रस्थापित करण्याचा आजीवन प्रयत्न केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी आपल्या ग्रामचळवळीच्या मार्गदर्शक ग्रामगीता या काव्यातून मांडले. तुकडोजी महाराजांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. पारतंत्र्यात जन्मलेले तुकडोजी महाराज इंग्रजी राजवट आणि त्यानंतरच्या स्वातंत्र्याचे केवळ साक्षीदारच नाही तर क्रियाशील प्रवक्ते होते. जनतेला सरंजामशाही व मध्ययुगीन मनोवृत्तीतून पासून बाहेर काढण्याची गरज ओळखून महाराजांनी हाती खंजिरी घेऊन हजारोंचा जनसमुदाय आपल्या वैखरीने मुग्ध केला.**

३० एप्रिल १९०९ ला यावली, जि.अमरावती येथे श्री नामदेव गणेशपंत इंगळे ठाकूर ब्रह्मभट्ट (बंडोजी) आणि माता मंजुळादेवी या अशिक्षित दांपत्याच्या पोटी चंद्रमौळी झोपडीत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला. अकोटचे ब्रह्मनिष्ठ हरिबुवा आणि माधानचे अलौकिक संत श्री गुलाबराव महाराज यांनी नामकरण विधी केल्यावर त्यांच्या मूळनाव माणिकदेव या जन्मनावाऐवजी गुरुदत्त 'तुकड्या' नाव प्रचारात आलं.

बालपणीच मातेसह गृहत्याग करावा लागल्यानंतर वरखेड येथे विदेही संत श्री आडकोजी महाराजांच्या सहवासात ते सर्वार्थाने फुलले. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते. तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला तरच राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता.

**खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा । झटू सर्व भावे करू स्वर्ग गावा ।। कळो हे वळो, देह कार्यी पडू दे । घडू दे प्रभो, एवढे हे घडू दे ।।**

याप्रमाणे महात्मा गांधींच्या स्वप्नातील ग्रामस्वराज्यानुसार ग्रामरचना करण्याचा प्रयत्न तुकडोजी महाराजांनी केला.

**व्यक्ती व्हावी कुटुंबपूरक । कुटुंब व्हावे समाज पोषक । तैसेचि ग्राम व्हावे राष्ट्र सहाय्यक । राष्ट्र विश्वा शांतीदायी ।।**

आपल्या वाट्याला आलेली कामे निष्ठेने करणारा



कर्मयोगी समाज महाराजांना अभिप्रेत होता. त्यांच्या गुरुदेव सेवा मंडळाने वऱ्हाडातल्या खेड्या खेड्यांमध्ये चैतन्य निर्माण केले होते. सर्वधर्मियांना एकत्र आणता येईल अशा सामुदायिक प्रार्थनाचा मार्ग तुकडोजीं महाराजांनी दाखविला. माणूस-माणसाशी-गावाशी आणि शेवटी विश्वबंधुत्वापाशी नेण्याचे स्वप्न तुकड्यादासांनी पाहिले.

**'अब काहे को शोर मचाते हो दुखवाकर भारत सारे । आते है नाथ हमारे ।।'**

अशी स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरलेली खंजेरी भजने १९४२ काळात तुकडोजी महाराजांनी सर्वतोमुखी पोहचविली. एवढेच नव्हे तर 'पत्थर सारे बाम बनेंगे । झाड झडूले शस्त्र बनेंगे ।।' असा गर्भित इशाराही त्यांनी दिला. संघटित झाल्याशिवाय पर्याय नाही ही एकजुटीची धर्मनिरपेक्ष भाषा भारतीयांच्या मनामनापर्यंत पोहचवली. ४२ च्या लढाईच्या वेळी तुकडोजी महाराजांना तुरुंगवासही झाला, पण जनमानसाच्या हृदयसिंहासनावर विराजमान महाराजांना असंतोषाच्या भीतीमुळे सरकारने लवकरच मुक्त केले.

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना तसेच ग्रामगीतेचे लेखन हे तुकडोजी महाराजांच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे. ग्रामगीता ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच होय. स्वतःला ते तुकड्यादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत, त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले, ह्याची त्यांना जाणीव होती.

खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल, याविषयी त्यांनी सुचविलेली उपाययोजना अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळा्वे, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटले आहे. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. **क्रमश :**



# लावणी नृत्यगनांनी रशियाच्या रंगमंचकावर थिरकवले सेंट पीटर्सबर्ग नागरिकांचे पाय

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**पुणे :** बहुरंगी बहूढंगी महाराष्ट्राचा लोकसंस्कृतिक चेहरा असलेली धडाकेबाज लावणी रशिया देशातील महत्वपूर्ण शहर असलेल्या सेंटपीटर्सबर्ग मधील बालटिक हाऊस या अंतरराष्ट्रीय सांस्कृतिक भवनात आयोजित कार्यक्रमात सादर करण्यात आली होती. लावणीच्या अदा भाव मुद्रा पाहून रसिक मंत्रमुग्ध झाले होते मराठी लावणी नृत्यगना आणि हार्मोनियम डोलकी वादक कलाकारांनी रशियन नागरिकांना रंगमंचकावर नाचविले या अंतरराष्ट्रीय रंगमंचकावर लावणी चे आयोजन प्रसिद्ध नृत्यदिगदर्शक अभ्यासक भूषण कोरेगावकर यांनी केले होते.

या व्यतिरिक्त सेंटपीटर्सबर्ग युनिव्हारसिटीतील भारतीय अभ्यासिका मध्ये ही लावणी प्रात्यक्षिक सादर केले. यात जेजुरी येथील कलाभुषक हार्मोनियम वादक संगीत आयोजक चंद्रकांत लाखे, विनायक जावळे, सुमित कुढाळकर नृत्यगणा पुष्पा सातारकर, गौरी जाधव, शकुंतला नगरकर, लता वाईकर, गिनतांजली मालवणकर यांनी सहभाग घेतला होता भूषण कोरगावकर हे प्रसिद्ध लावणी अभ्यासक असून लावणी, नाट्य संगीत प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्रात सुरु केले याचा फायदा लावणी लोक कलावंतांना झाला याबाबत संगीत आयोजक चंद्रकांत लाखे शकुंतला नगरकर यांनी कृतज्ञा व्यक्त केली आहें रशियाने सेंटपीटर्सबर्ग शहरातील बालटिक हाऊस मध्ये विविध देशातील नाट्य सिनेमा संगीत लोककलावन्त,आशा विविध विषयावर संस्कृतीक उत्सवाचे आयोजन केले होते लावणी नृत्यगणा यांच्या नऊवारी साडी घुंगरे सारख्या लोककला साहित्यानी रशियन आणि इतर देशातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

## कालेश्वरम प्रकल्प म्हणजे केसीआर फॅमिली एटीएम

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्प तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव आणि त्यांच्या कुटुंबियांचे 'एटीएम' असून यात हजारो कोटींचा घोटाळा झाला आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला आहे. आज गुरुवारी त्यांनी महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील मेडीगड्डा धरणाला भेट दिली. यावेळी आंबटपल्ली गावात झालेल्या सभेत त्यांनी हे आरोप केले.

२१ ऑक्टोबररोजी रात्रीच्या सुमारास महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील मेडीगड्डा धरणाला भेगा पडल्याने सीमाभागात तणाव निर्माण झाला आहे. तेलंगणा येथे सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा चांगलाच तापला आहे. मेडीगड्डा धरण कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पाचाच भाग असल्याने या पूर्ण प्रकल्पावरच काँग्रेसने प्रश्न उपस्थित केला आहे. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज २ नोव्हेंबररोजी सकाळी ९ वाजता महाराष्ट्र सीमेवरील भुपलपल्ली जिल्ह्यातील आंबटपल्ली गावात सभा घेतली. सोबतच मेडीगड्डा धरणाला भेट देऊन पाहणी केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री केसीआर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी या प्रकल्पात एक लाख कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला. या प्रकल्पातील धरणाचे निकृष्ट बांधकाम करून केसीआर यांनी कोट्यवधी लाटले, नागरिकांना मात्र, यामुळे कोणताही लाभ मिळालेला नाही. हा प्रकल्प म्हणजे 'केसीआर फॅमिली एटीएम' असल्याचेही राहुल गांधी म्हणाले. यावेळी धरण परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. काही काँग्रेस कार्यकर्त्यांना त्याठिकाणी जाण्यास मज्जाव करण्यात आल्याने वाद निर्माण झाला होता. हा परिसर गडचिरोली जिल्ह्याच्या सिरोंचा तालुक्याला लागून असल्याने या भागातदेखील राहुल गांधींच्या दौऱ्यानिमित्त उत्सुकता होती.

## कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते बेलपाडा जळकुंभ कामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज


**उरण :** कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते अनेक विविध विकास कामांचे भूमिपूजन, उद्घाटन होत असून त्यांनी आजपर्यंत अनेक विकास कामे मार्गी लावली आहेत. जिल्हा परिषद निधीतून गव्हाण जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील यांच्या जिल्हा परिषद फंडातून गव्हाण येथे पिण्याच्या पाण्याची टाकी नियोजित असून सदर कामाचे भूमिपूजन कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी गव्हाण जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य पंकज पाटील, ग्रामस्थमंडळ बेलपाडा खजिनदार संतोष म्हात्रे, सचिव आतिश पाटील, सहसचिव बाळु देशमुख, प्रसाद म्हात्रे, महेश पाटील नरेश घरत, गोरक्षनाथ कडु, चंद्रकांत ठाकूर, प्रकाश कडु विजय कडु, संतोष घरत, संदीप कोळी, शाम म्हात्रे, अशोक घरत, पदाजी म्हात्रे, निलेश पाटील,बंटी पाटील, रमेश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती

### भारताच्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार



वल्लभभाई पटेल यांची जयंती जवळा येथील जि. प. शाळेत साजरी करण्यात आली तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांना त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त शाळेतील चिमुकल्यांनी पुष्पवंदन करुन अभिवादन केले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष घटकार, विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, माता पालक संघाच्या अध्यक्षा मनीषा गच्चे, शिक्षक मित्र कविता गोडबोले, हैदर शेख, हरिदास पांचाळ, बालाजी पांचाळ आदींची उपस्थिती होती. शालेय बालसभेने कार्यक्रमाचे आयोजन केल्यानंतर मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला आणि आयर्न लेडी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आणि विद्यार्थी विद्यार्थिनींनी पुष्प वाहून अभिवादन केले. संतोष अंबुलगेकर यांनी पटेल आणि गांधी यांच्या कार्याचा परिचय मुलांना करून दिला. म. गांधी शालेय बालसभेच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.




## 'चितांग' चित्रपटाचा ज्योती टॉकीजमध्ये आज होणार प्रीमीअर शो

### निर्माता आरिफ शेख, दिग्दर्शक फैज अहमद यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आयमन फिल्मस प्रस्तुत आरिफ शेख यांची निर्मिती असलेला आणि दिग्दर्शक फैज अहमद यांनी दिग्दर्शित केलेला 'चितांग' या अहिराणी चित्रपटाचा प्रीमिअर शो धुळे शहरातील ज्योती चित्रपटगृहात दि. 3 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आल्याची माहिती चित्रपटाचे निर्माता आरिफ शेख, दिग्दर्शक फैज अहमद धुळेकर यांनी पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रशेखर पाटील, नाट्य-चित्रपट कलावंत भटू चौधरी, कॅमेरामन डीओपी सत्तार शेख, सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. फैज अहमद यांनी सुमारे १० वर्षांपूर्वी 'चंदन' हा पहिला अहिराणी चित्रपट दिग्दर्शित केला होता. मोठ्या कालावधीनंतर अथक परिश्रमातून त्यांनी आता 'चितांग' हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. त्यांच्या अहिराणी भाषेवरील प्रेमाने भारावून व अहिराणी भाषेसाठी काहीतरी योगदान द्यावं असे मनापासून वाटल्याने या चित्रपटाची निर्मिती केली अशी भावना निर्माता आरिफ शेख यांनी व्यक्त केली. 3 नोव्हेंबर रोजी 'चितांग' हा चित्रपट ज्योती टॉकीज येथे प्रदर्शित केला जाणार आहे. त्यानंतर दररोज 12 वाजता या चित्रपटाचा शो होणार आहे. या चित्रपटात मुंबईतील स्टार कलाकारांसह खान्देशातील अनेक कलावंतांनी भूमिका साकारल्या आहेत. सामाजिक व कौटुंबिक विषयावरील हा चित्रपट आहे. खान्देशातील अहिराणी व मराठी भाषिक कुटुंबांनी एकत्र येऊन हा चित्रपट अवश्य पाहावा असे आवाहन यावेळी निर्माता आरिफ शेख, दिग्दर्शक फैज अहमद यांनी केले आहे.



# इगतपुरी तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींचा मराठा आरक्षण मागणीला जाहिर पाठींबा

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** मुंईत बुधवारी मराठा आरक्षणावर तोडगा काढण्यासाठी अजून वेळ मिळावा तसेच मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेवून सहकार्य करावे असा ठराव सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीत झाल्यानंतर जरांगे पाटील यांनी आपण आरक्षण मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचे जाहीर केल्यानंतर आज सकाळपासून नाशिक जिल्ह्यात मराठा आरक्षण लढयाला अजूनच  धार चढली आहे. जिल्ह्यात आदिवासी बहुल इगतपुरी तालुक्यात देखील या आंदोलनाचे पडसाद अधिक तीव्र होताना दिसत असून मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून इगतपुरी तालुक्यातील तब्बल ९६ ग्रामपंचायतींनी मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आपला पाठींबा जाहिर केला आहे. घोटी सिन्नर फाटा चौफुलिवर साखळी उपोषण स्थळी सरपंच संघटनेच्या पदाधिकारी यांनी तसे पत्र याठिकानी देवून आपला पाठींबा व्यक्त केला आहे.
विशेष म्हणजे राज्यातील इगतपुरी या एकमेव तालुक्यातील विविध जाती धर्माच्या लोकनियुक्त सरपंच,उपसरपंच,सदस्य यांचा सहभाग असलेल्या सरपंच संघटनेने या साठी पुढाकार घेवून मराठा आरक्षणासाठी आपला पाठींबा देवून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणी साठी आज इगतपुरी तालुका सरपंच संघटना महिला तालुकाअध्यक्ष व सांजेगावच्या सरपंच नीता गोवर्थने,तालुका उपाध्यक्ष व घोटी उपसरपंच स्वाती कडू, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष हरिश्चंद्र चव्हाण, काशिनाथ कोरडे , सरपंच संघटना सचिव अड़ मारुती आघाण, उपसरपंच गणेश गायकर, सरपंच ज्ञानेश्वर उघडे, सरपंच रमेश पथवे, सरपंच विलास जोशी, सरपंच बापू मते, उपसरपंच दत्तु मते , उपरपंच गोपाळ वाजे, सरपंच संगीता धोंगड़े, गणेश टोचे, पुंडलिक साबळे, विनोद आवारी, ताई बिन्नर, बहिरू लगड, देवा मोरे आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.



इगतपुरी तालुक्यात विविध जाती धर्माचे नागरिक गुण्या गोविंदाने राहतात . त्यात प्रत्येक समाजाचे एकमेकांशी ऋणानुबंध जुडलेले आहेत . गेल्या अनेक वर्षापासुन मराठा आरक्षण मागणी सातत्याने होत आहे . मात्र त्यावर शासकीय पातळीवर कसलाही पाठपुरावा केला जात नाही हेच खूप मोठे दु :ख आहे . आरक्षण मागणी साठी अबघा मराठा समाज सरसावलेला असताना आम्हीहि त्यांच्या पाठीशी खंबिर असायला हवे . म्हणून आम्ही सरपंच संघटनेच्या माध्यमातून मराठा आरक्षण मागणी ला सपोर्ट केला आहे .
सौ . स्वाती कडू, उपसरपंच घोटी/ महिला तालुका उपाध्यक्ष सरपंच संघटना

# मराठा आरक्षणासाठी पिंपरीत तहसील कार्यालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठा समाजाला ४० दिवसात आरक्षण दे दिलेले आश्वासन न पाळता राज्य शासनाने फसवणूक केल्याचा आरोप करत त्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने आकुर्डीतील तहसील कार्यालयावर २ नोव्हेंबर रोजी मोर्चा काढला. आंदोलकांनी घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.
मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागात लाक्षणिक, साखळी उपोषण सुरु आहेत. आरक्षणाच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी मेणबत्ती पदयात्रेनंतर आता मराठा आंदोलकांनी तहसील कार्यालयावर धडक दिली. आकुर्डीतील खंडोबामाळापासून मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे, एक मराठा, लाख मराठा, या सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पाय अशा जोरदार घोषणांनी आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला. प्रकाश जाधव,मारूती भापकर,धनाजी येळकर पाटील यावेळी उपस्थित होते. आकुर्डी येथे तहसीलदारांना निवेदन दिल्यानंतर मोर्चाची सांगता झाली. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोर्चासोबत पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता.

# गांजा वाहतुक करणाऱ्याच्या एलसीबीने आवळल्या मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्विफ्ट वाहन 8055 मधुन गांजाची वाहतुक होणार असुन सदर वाहन मुंबई आग्रा महामार्गवर धुळे कडुन मालेगाव कडे जाणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने सदर वाहनाबाबत खात्री करून कारवाई करणेबाबात पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय शिंदे यांनी स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकास यांना आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावुन मोहाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवधान गावाजवळ मुंबई आग्रा महामार्गवर धुळे कडुन मालेगाव कडे येणारे स्विफ्ट वाहन क्र. MH 14 DZ 8055 अडवुन त्यातील इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव गाव मेहबुब सान उसमान खान, वय 62 वर्ष, रा. 12 इमाम कोटला पास मल्ली. अहमदनगर असे सांगतीले. त्याच्या ताब्यातील स्विफ्ट वाहनाची पंचासमक्ष झडती घेता त्यात गांजा मिळुन आला असुन त्याचा ताब्यातुन (1) 51,050/- रुपये किमतीचा 10 किलो 210 ग्रॅम गांजा 2) 3 लाख रुपेय किंमतीची स्विफ्ट गाडी असा एकुन 3,51,050/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. मेहबुब खान उसमान खान याच्याकडे अधीक विचारपुस करता तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने पुढील तपास कामी त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. पोशी / कमलेश सुर्यवंशी, नेमणुक स्थागुशा, धुळे यांनी दिलेल्या फिर्याद वरुन आरोपी नामे मेहबुब खान उसमान खान, वय 62 वर्ष, रा. 12 इमाम कोटला घास गल्ली, अहमदनगर यावेविरुद्ध मोहाडी उपनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





# स्थानिक राजकारणात साधू संतांची नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न; जेजुरीगडावर जाहीर निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** सध्या जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून आपल्या राजकीय मतभेद आणि स्वार्था करिता काही समाजकंटाकांनी प्रख्यात सद्गुरू सामाजिक कार्यकर्ते दादा महाराज जगताप यांची जादूटोणा करत असल्याचे बिनबुडाचे आरोप करीत त्यांना बदनाम करण्याचा कुटील प्रयत्न केला आहें या बाबतची खोटी माहिती एका खाजगी चॅनलवरही देण्यात आल्याची घटना चाकण नजिकच्या निगोज या गावी घडल्याने सद्गुरू दादामहाराज यांच्या राज्यातील  शिष्य गणांना जेजुरी येथील खंडोबा गडावर भजन कीर्तन करीत जाहीर निषेध व्यक्त केला आहें याबाबत मिळालेल्या माहिती नुसार सद्गुरू दादा महाराज जगताप हे निगोज येथील मंदिरात देवदर्शनाला मिळालेल्या निमंत्रणा नुसार गेले होते येथें दर्शन घेऊन तेथील शिष्यगणांची भेट घेऊन निघून गेले असता येथील काही समजाकंटाकांनी आपला राजकीय हेतू साधण्या करिता सीसी टीव्ही फुटेजचा आधार घेऊन एका खाजगी यु ट्यूब वृत्तवाहिनीस पाठवून दिशाभूल करणारी बातमी प्रसिद्ध केली या मुळे राज्यभरातील शिष्य गणांनी तीव्र शब्दात निषेध जेजुरी गडावर व्यक्त केला असून जादू टोणा सारखे कोणतेही कृत्य केले नसल्याचे सांगत या बाबत पुरावा सिद्ध करण्याचे आव्हान करण्यात आले आहें अन्यथा माफी न मागितल्यास मानहनीचा दावा दखल करीत उपोषणाचा इशाराही दिला आहें महाराजांनी अनेक ठिकाणी मठाची निर्मिती करून गरीब अनाथाना मदत केली असून महाराज आणि त्यांच्या शिष्यगणांनी करुणा काळात रस्त्यावर उतरून लोकसेवाही केली आहें शालीय सामाजिक उपक्रमात नेहमी मदतीचा हात देण्याचे काम केले आहें ते नेहमीच धार्मिक अनुष्ठनाच्या  माध्यमातून धार्मिक सामाजिक उपक्रम राबवित असतात.

# गोंदे दुमाला येथे अन्नत्याग करीत नाठे यांचे उपोषण सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** मराठा आरक्षणाचा लढा महाराष्ट्रामधे जोर घेत असून याला इगतपुरी तालुक्यात विविध गावांनी समर्थन दिले आहे. त्यानुसार मराठा आरक्षणाचे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचा समर्थनार्थ गोंदे दुमाला येथे सामाजिक कार्यकर्ते रतन नाठे आणि ग्रामस्थांनी अन्नत्याग करीत उपोषण सुरु केले आहे. जो पर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत माघार घेणार नाही अशी कडक भूमिका यावेळी घेण्यात आली. गोंदे दुमाला ही औद्योगीक वसाहत आणि मध्यवर्ती गाव असुन येथे घेतलेला निर्णय परिसरात वाऱ्यासारखा पसरला आहे. त्यामुळे या उपोषणाला वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. परिसरातून ह्या उपोषणाच्या ठिकाणी नागरिक गर्दी करीत आहे. ह्या आंदोलनात सर्व ग्रामस्थ माझ्या सोबत असल्याचे रतन नाठे यांनी सांगितले. याप्रसंगी राजाराम नाठे, कमलाकर नाठे, रमेश नाठे, केशव नाठे, रोहिदास नाठे, शरद सोनवणे, मोहन जाधव, गणेश नाठे, सुनील नाठे, रामदास सोनवणे, कुंडलिक धोंगडे, भाऊसाहेब कातोरे, जीवन नाठे, धनंजय नाठे, विशाल जाधव, हर्षद भागवत आदी हजर होते.




# बच्चू कडू आंतरवालीत; सरकार आणि जरागेंमध्ये संवाद घडवण्याची जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत असलेल्या मनोज जरांगे  यांच्या उपोषणाचा आजचा 9 वा दिवस आहे. दरम्यान, मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवर जरांगे ठाम असून, तोपर्यंत आपण उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. अशातच आमदार बच्चू कडू यांनी बुधवारी रात्री मनोज जरांगे यांची भेट घेऊन संवाद साधला आहे. तसेच यापुढे देखील सरकार आणि जरागेंमध्ये संवाद घडवण्याची जबाबदारी बच्चू कडू यांच्यावर सोपवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांचे आंदोलन सुरू असेपर्यंत आमदार बच्चू कडू अंतरवली सराटी येथेच तळ ठोकून राहणार आहे.
मनोज जरांगे यांनी दुसऱ्या टप्प्यात सुरु केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आली आहे. तसेच, आंतरवाली सराटी गावात देखील नेत्यांना येण्यास आंदोलकांकडून मनाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर जरांगे यांनी एक पाऊल मागे घेत आपण एकदा सरकारशी चर्चा करण्यासाठी तयार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे, आमदार बच्चू कडू यांनी सरकारची बाजू मांडण्यासाठी बुधवारी जरांगे यांची आंतरवालीत जाऊन भेट घेतली. तसेच त्यांच्यामध्ये चर्चा देखील झाली. तर, जरांगे यांनी पाणी घेण्याची विनंती यावेळी कडू यांनी केली. मात्र, जरांगे यांनी याला नकार दिला. दरम्यान, यापुढील आंदोलक आणि सरकारमध्ये संवाद घडवून आणण्याचे काम बच्चू कडू यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## सुभाष नाईक शिवसेना जिल्हा उपसंघटकपदी

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** जिल्ह्यातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची कार्यकारिणी जाहीर झाली असून शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते सुभाष नाईक किनीकर यांची निवड करण्यात आली आहे. मागील ३५ वर्षांपासून सेनेशी एकनिष्ठ राहून पक्ष बळकटीसाठी मेहनत घेतली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन नांदेड जिल्हा उप-संघटकपदी निवड करण्यात आली आहे. सपंर्क प्रमुख बबनराव थोरात, जिल्हा प्रमुख बबन बारशे यांच्या दुरदृष्टी धोरणामुळे मुळे नाईक यांना संधी मिळाली आहे. यामुळे सर्व सामान्य शिवसैनिक व जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे. त्याच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## वैमनस्यातून कोयत्याने वार करून तरुणाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वडगाव शेरी परिसरात तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन खून करण्यात आल्याची घटना बुधवारी रात्री घडली. तरुणाच्या खुनामागचे कारण समजू शकले नाही. वैमनस्यातून तरुणाचा खून झाल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. अभिषेक राठोड (वय ३१) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक बुधवारी (१ नोव्हेंबर) रात्री वडगाव शेरीतील ब्रम्हा सनसिटी सोसायटीत परिसरातून निघाला होता. त्यावेळी हल्लेखोरांनी त्याला अडवले. राठोड याच्यावर कोयत्याने वार केले. या घटनेची माहिती मिळताच चंदननगर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. राठोडला तातडीने रुग्णालयात दाखल केले असता उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.




# आरक्षण नाही तर परीक्षा नाही; शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचा परीक्षांवर बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उपोषणार्थींची प्रकृती खालावली :** तहसील कार्यालयात सकल मराठा समाजाच्या वतीने 29 ऑक्टोबर पासून तीन उपोषणार्थींनी उपोषण सुरू केले यामध्ये विलास रोकडे यांची उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रकृती खालवल्याने त्यांना चिंताजनक परिस्थितीत रात्री ८ वाजण्याच्या जिंतूर ट्रामा केअर सेंटर मध्ये दाखल करण्यात आले त्यामुळे दिवसेंदिवस या उपोषणार्थींची प्रकृती खालावत आहे .परंतु प्रशासन याकडे गांभीर्याने घेत नसल्याचे पाहायला मिळत आहे .

**जिंतूर :** मराठा आरक्षणाचा मुद्दा सध्या जोर धरत असताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आता मराठा आरक्षणाला पाठिंबा देत चक्क आरक्षणासाठी सहामाही व वार्षिक परीक्षावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून याबाबत जिंतूर तालुक्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुवार 2 नोव्हेंबर रोजी जिंतूर तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.
जिंतूर शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकत जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत सहामाही वार्षिक परीक्षा न देण्याचा निर्णय घेतला.गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे महाविद्यालय भरेल, असे वाटत असतानाच अचानक सर्व मुले शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ जमली. क्षणभर काही कळायच्या आतच घोषणा सुरू झाल्या. आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, कोण म्हणतंय देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, जय शिवाजी जय भवानी, आरक्षण नाही तोपर्यंत परिक्षा नाय, असा पवित्रा घेतला. त्यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापकांचाही नाईलाज झाला. प्रवेशद्वाराजवळ शेकडो विद्यार्थी जमा झाले तसेच जरांगे-पाटील यांना पाठिंबा म्हणून आंदोलन केले.यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून देताना आरक्षण नसेल तर शिकून तरी काय करायचे, आम्हाला सवलत नसल्याने, आमची ऐपत नसल्याने, उच्च शिक्षण घेता येणार नाही. त्यापेक्षा सरकारने आरक्षण द्यावे. दिले नाही तर पेपर पण नाही, शाळा पण नको, या भूमिकेशी आम्ही ठाम राहणार, असल्याचे सांगत शहरातून घोषणा देत चक्क तहसील कार्यालय गाठले या ठिकाणी उपोषण स्थळी बसलेल्या मराठा बांधवांना पाठिंबा देत आरक्षण नाही तर परीक्षा नाही याबाबतचे निवेदन तहसीलदारांना दिले. तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनावर आदित्य गायकवाड, नरेश बिराजदार, शुभम शिंदे ,अंकुश नेवरे, अजिंक्य देवकर ,योगेश सोळंके, गणेश जाधव यांच्यासह शेकडे विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

## 24 तासांत लुटारूचा छडा, आरोपीसहीत 39 लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** फायनान्स कंपनीचे लोक सांगून बोलेरो गाडीवर हप्ते थकित आहेत म्हणून हि गाडी धुळे येथे फायनान्स ऑफीसला घेवून जावी लागणार आहे. असे सांगून तक्रारदारांस शिवीगाळ व मारहाण करुन तक्रारदार आणि सोबतचा साक्षीदाराचा मोबाईल व पैसे बळजबरीने हिसकावून घेवून महिन्द्रा बोलेरो पिकअप व त्यातील 39 लाखाचा शेतीपयोगी औषधांचा माल सहित बळजबरीने हिसकावून चोरून घेवून नेला होता.

धुळे तालुका पोलीस ठाणे येथे अपराध भादंवि कलम 394 प्रमाणेचा गुन्हा दाखल असून यातील तक्रारदार रविंद्र वसंतराव देशमुख हे दिनांक 01 रोजी मेहुणबारे येथून 33,05,933/- रुपयाचा शेतीपयोगी औषधांचा माल घेवून धुळे चाळीसगांव रोडने धुळे कडे येत असतांना सायंकाळी 05.00 वा. चे सुमारास शिरुड चौफुली ता.जि.धुळे येथे पुलाचे पुढे 500 मीटर अंदाजे रोडावर एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी अनोळखी इसमांनी तक्रारदाराची महिन्द्रा बोलेरो पिकअप क्रमांक-MH-37-J-1991 थांबवून आम्ही फायनान्स कंपनीचे लोक आहोत तुमच्या बोलेरो गाडीवर हप्ते थकित आहेत म्हणून ही गाडी धुळे येथे फायनान्स ऑफीसला घेवून जावी लागणार आहे. असे सांगून तक्रारदारांस शिवीगाळ व मारहाण करुन तक्रारदार आणि सोबतचा साक्षीदाराचा मोबाईल व पैसे बळजबरीने हिसकावून घेवून महिन्द्रा बोलेरो पिकअप व त्यातील शेतीपयोगी औषधांचा माल बळजबरीने हिसकावून चोरून घेवून गेले. नमुद घटनेची माहिती डायल-112 वर प्राप्त होताच पोनि प्रमोद पाटील, पोउनि दिपक धनवटे, नितीन चव्हाण, किशोर खैरनार, प्रविण पाटील, दगडू कोळी, कुणाल पानपाटील, उमेश पाटील, विशाल पाटील, मुकेश पवार, सुरेंद्र खांडेकर, राजू पावरा, नंदु चव्हाण, अशांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेवून तक्रारदार यांना अधिक विचारपूस करुन त्यांचेकडून अनोळखी चोरटयांची माहिती विचारून चोरीस गेलेले वाहनांचा क्रमांकाची माहिती घेवून पोलीस अधीक्षक, धुळे संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उप-विभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांना घटनेची माहिती देवून त्यांच्या मार्गदर्शनांत नमुद तपास पथकाने तपासाची चक्रे फिरवून अवघ्या 24 तांसात गुन्हयाचा गुन्हयाचा छडा लावून जापी, ता. जि. धुळे शिवारातून गुन्हयातील आरोपी व चोरीस गेला माल 6 लाख रुपये किंमतीची बोलेरो पिकअप व्हॅन सोबत 33,05,933/- रुपयाचे शेती उपयोगी औषधे, रोख रुपये, आणि गुन्हयात वापरलेली स्विफ्ट गाडी असे एकुण 39,05933 जप्त करुन गुन्हा उघडकिस आणला असून नमूद गुन्हयाचा पुढील तपास पोउनि दीपक धनवटे करीत आहेत.

## लोकप्रतिनिधींच्या घरांची जाळपोळीचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनात मराठवाड्यात लोकप्रतिनिधींच्या घरांची जाळपोळ करण्यात आली. या घटनेचा तेली समाजाने जाहीर निषेध करत एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले. या घटनेत दोषी असणाऱ्यांवर कारवाई न केल्यास रस्त्यावर उतरू व त्याची जबाबदारी शासनाची असेल, असा निर्वाणीचा इशाराही निवेदनातून देण्यात आला. मराठा समाजाच्या आरक्षणास तेली समाजाचा विरोध नसतानाही मराठा आंदोलकांनी अखिल भारतीय तैलिक शाहू सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, युवक आघाडीचे प्रदेश अध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर यांच्या कार्यालयाची तोडफोड करुन, त्यांचे घर पेटवले तसेच त्यांच्या चारचाकी गाड्यांचीसुद्धा तोडफोड केली. त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे राज्य अध्यक्ष व भाजपा खासदार रामदास तडस, सरचिटणीस डॉ. भूषण कर्डिले, कोषाध्यक्ष गजानन शेलार यांनी या हल्ल्याच्या निषेध केला. तसेच राज्य सहसचिव बळवंत मोरघडे यांचे नेतृत्वात एक शिष्टमंडळ बुधवारी दुपारी ३ वा नागपूरचे जिल्ह्याधिकारी डॉ. विपीन इटनकर, यांना भेटले व त्यांच्या मार्फत निषेधाचे निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवण्यात आले.

## दौंडतच्या विकासासाठी सदैव तत्पर : शिंदे

आधुनिक केसरी न्यूज



**इगतपुरी :** तालुक्यातील शेतकरी नेते म्हटले म्हणजे प्रामूख्याने नाव घेतले जाते ते म्हणजे पांडुरंग मामा शिंदे हे होय गेल्या चाळीस वर्षांपासून सामाजिक क्षेत्रातून आपल्या राजकीय क्षेत्रात नेहमीच त्यांचं नाव राहील आहे सरपंच ते काँग्रेसचे विविध पदे भूषविले आहेत. घोटी बाजार समिती वर दोन पंचवार्षिक संचालक, सोसायटीत वीस वर्ष संचालक व चेअरमन व व्हाईस चेअरमन तसेच गेल्या पंचवीस वर्षापासून दौंडत ग्रामपंचायत मध्ये त्यांनी सरपंच पद भूषविले आहेत. स्वर्गीय गोपाळराव गुळवे यांच्या कुशीतला कार्यकर्ता म्हणजे पांडुरंग मामा शिंदे यांचे नावं सर्व जिल्हाभर प्रसिद्ध आहे लोकनेते गोपाळराव गुळवे यांच्या सोबत काम करून गावाच्या विकासात मोलाचा वाटा आहे त्यांचा त्यात अनेक कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम पांडुरंग मामा शिंदे यांनी केले आहे राजकीय जीवनात अनेक कार्यकर्ते घडवले. सरपंच ते काँग्रेस तालुकाध्यक्ष, जिल्हा उपध्यक्षग, अनेक शासकीय समित्या, प्रदेश कोंगेस कृषी सेल च्या सचिव असे अनेक पदे त्यांनी भूषवली आहेत दरम्यान त्यांच्या कार्यकाळात दौंडत गाव हे विकासापासून मोठ्या प्रमानात वंचीत होते मात्र पांडुरंग मामा शिंदे यांनी गेल्या चाळीस वर्षापासून विकासाचा ध्यास घेत मोठ्या प्रमनात विकासकामे केली आहे. गावात गेल्या चालीस वर्षापूर्वी रस्ता नव्हता ते वर्ष म्हणजे 1977 ते 1982 साली तत्कालीन माजी आमदर घारे यांच्या माध्यमातून रस्ता केला रोजगार हमीतुन कामे केले असून तेव्हा गावात जाण्यासाठी रस्ता झाला आहे.

तेव्हापासून आता पर्यंत डांबरीकरण ते काँक्रिटीकरण झाले आहे तसेच सुरवातीच्या काळात विद्युत पुरवठा करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले आहे स्वतःच्या विद्युत पूर्वठा, शाळा इमारत, अंगणवाडी केंद्र आदी सुखसुविधा उपलब्ध केल्या आहेत गाव पातळीवर सुरवातीला शिक्षणाची, आरोग्याची मुलांचे शिक्षणसाठी इमारती ची सोय पांडुरंग मामा शिंदे यांनी केली आहे गोपाळराव गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हायस्कुल निर्मिती करण्याचे काम त्यांनी केले आहे.


हिवराळे क्लिनिक

ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444

डॉ. के.बी. हिवराळे

आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ

B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



सत्यशोधक विद्यार्थी संघटना व सत्यशोधक डेमोक्रॅटिक पार्टी यांच्या वतीने धुळ्यात मराठा आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला. या ठिकाणी सत्यशोधकचे राकेश अहिरे यांनी सांगितले की सध्याच्या परिस्थितीत गरीब मराठ्याचं शोषण होत आहे. त्यांना न्याय हक्क मिळण्यासाठी यासाठी आम्ही जाहीर पाठिंबा देत आहोत, असे या ठिकाणी सांगितले प्रशासकीय व नोकरी वर्ग या ठिकाणी त्यांना न्याय मिळावा आरक्षण मिळावे, यासाठी सदैव आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, असे धुळे शहरातील मराठा आंदोलनाच्या ठिकाणी सांगण्यात आले. या ठिकाणी उपस्थित राकेश अहिरे, शरद वेंदे, अमोल शिरसाट व इतर सत्यशोधक पदाधिकारी उपस्थित होते.

# जड वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतूक कोंडी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जड वाहनांना प्रवेशबंदीची वेळ व नियमांचे उल्लंघन करून अनेक वाहने थेट शहरातून धावत आहेत. यामुळे प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक पोलिसांशी हातमिळवणी करून ही वाहने शहरात येत असल्याच्या तक्रारी आहेत. अवजड वाहने शहराबाहेरून जाण्यासाठी बाह्यवळण रस्त्यांचा पर्याय आहे. तरीही ही वाहने शहरातून जातात. एकीकडे शहरात नाकेबंदी सुरू असताना अवजड वाहनांवर कारवाई होताना दिसत नाही. अवजड वाहनांना ठराविक वेळेत शहरात प्रवेश करण्यास बंदी आहे. या वेळेत विद्यार्थी आणि नोकरदारांची मोठी वर्दळ असते. स्थानिक नागरिकही कामानिमित्त घराबाहेर पडतात. अशा वेळी अवजड वाहनांनी शहरात प्रवेश केल्यास रस्त्यांवर वाहतूक कोंडी होते. अशा अपघातांना आळा बसावा, वाहतूक कोंडी कमी व्हावी, नियमभंग करून शहरात येणाऱ्या जड वाहन चालकांवर कारवाई व्हावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमीतील सिंचन विहीर लाभार्थ्यांना मिळणार कुशल बिले

## आ. विजय भांबळे यांच्या मागणीला यश

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** जिंतूर-सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी मा.आ.विजय भांबळे यांनी मागील १३ ऑक्टोबर २०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी, परभणी यांना भेटून शिष्ट मंडळासह विविध मागण्यांचे निवेदन लेखी स्वरुपात सादर केले होते. त्यात यावर्षीचा कोरडा दुष्काळ जाहीर करणे, पीकविमा मंजूर करणे, मागीलवर्षीचे अतिवृष्टीचे अनुदान वाटप करणे, पिकांना हमीभाव देणे, वीज सुरळीत ठेवणे व शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरीचे कुशलची देयके बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहेत त्यामुळे शेतकरी आर्थिक आडचणीत आला होता. त्यासाठी अनेक शेतकरी यांनी मा.आ. विजयराव भांबळे यांच्याकडे वारंवार मागणी केल्याने शेवटी मा.आ. विजयराव भांबळे साहेब यांनी सदर प्रश्न मार्गी न लावल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा निवेदनात दिला होता. त्या मागणीचा तात्काळ विचार करून जिंतूर तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कुशल बिलाची मागणी मार्गी लावली असून तालुक्यासाठी ६४ लक्ष रु. मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गात सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. जिंतूर तालुक्यातील शेतकरी यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी मी कटीबद्ध असून यापुढे देखील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावणार असे मत मा.आ.विजयराव भांबळे यांनी व्यक्त केले. तर शेतकरी वर्गातून सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांची कुशलची देयके मिळणार असल्याने मा.आ.विजय भांबळे यांच्याविषयी लाभार्त्यातून कृतज्ञता व्यक्त होत आहे.



# भक्तगणांसह साईनाथ महाराज बितनाळकर यांचा मराठा आरक्षणाला जाहिर पाठिंबा

## आंतरवाली येथे मनोजजरांगे यांची घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आपल्या कीर्तनातून जनजागृती करणारे आणि आपल्या अमोघ वाणीतून सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक तथा राष्ट्रीय पातळीवर प्रबोधन करणारे द. भ. प. साईनाथ महाराज बितनाळकर यांनी आंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज पाटील जरांगे यांची भेट घेतली आणि मराठा उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला तसेच त्यांच्या परिवारातील सदस्यांची आस्थेवाईकपणे चौकशीही केली. यावेळी समवेत भक्तमंडळी भाऊ पाटील हाडसणीकर, दतु पाटील, निळू पाटील, दता पाटील, पुडलींक पाटील, अंकुश पाटील, विलास पाटील, अर्जुन पाटील, इतर पाटील, ढकू पाटील, गोविंद पाटील, मधुकर शेगोळे, माळकोणी ढोले, रामा ठोंबरे, राहुल गोरे, बोचरे,रमेश टमखाने,फाळके, लक्ष्मण ढगे, अविनाश पाटील, हुलकावणे, अविनाश भालेराव, डोळस यांची उपस्थिती होती.

मराठा आरक्षणाबाबत निर्वाणीचा इशारा देत पाण्याचा थेंबही ग्रहण न करण्याचा कठोर निग्रह करणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे हे आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. मराठवाड्यात आरक्षणाची आग धुमसत असतांना सर्वपक्षीय नेत्यांचे आव्हानही त्यांनी धुडकावले आहे. श्रीक्षेत्र माहूरगडच्या आनंद दत्तधाम मठाचे अधिपती सद्गुरू साईनाथ महाराज बितनाळकर यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन पाठिंबा दिला. परिवारातील सदस्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांना धीर दिला.

यावेळी सरकारने तातडीने यावर तोडगा काढावा अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल, अशी भितीही त्यांनी व्यक्त केली.



# डॉ. दीपक ढोले यांचा निरोप समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जिल्हा परिषद बुलढाणा पशुसंवर्धन विभागातून ३४ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेतून डॉ. दीपक धोंडीबाराव ढोले ३१/१०/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले.

डॉ. दीपक धोंडीबाराव ढोले यांनी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती जळगाव जामोद येथे एक वर्ष तर सहायक पशुधन विकास अधिकारी पिंपळगाव काळे येथे सलग १२ वर्ष दिली होती. अतिशय शांत मनमिळावू, आपल्या कामाप्रती सजग असलेले डॉ.ढोले यांची २०१९ मध्ये पदोन्नती झाली होती.त्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये त्यांची पशुधन विकास अधिकारी म्हणून जळगाव जामोद येथे नियुक्ती झाली. त्यांनी एक वर्ष पंचायत समिती जळगाव जामोद येथे पशुधन विकास अधिकारी म्हणून कार्य केले. ३१ ऑक्टोबर रोजी ते आपल्या सेवेतून निवृत्त झाले. त्यानिमित्त पशुसंवर्धन विभागातील डॉ. पडघान, गविअ, डॉ. ईसड, डॉ. परिहार, डॉ. तळोकार, डॉ. जानोतकर, डॉ. गंन्धारे डॉ.खुपासे, तसेच जेष्ठ पत्रकार गुलाबराव इंगळे, जयदेव वानखडे, सागरकुमार झनके, नीलेश वानखडे, विनोद वानखडे, संभाजी ठाकुर, गणेश भड, आदी पत्रकार बांधवांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



# भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र रेल्वे प्रकोष्ट समितीच्या उपाध्यक्षपदी अनंत बोरकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनंत बोरकर यांना हे संघटनात्मक नियुक्तीपत्र मुंबई कार्यालयात दिले. कैलाश वर्मा हे या समितीचे मुख्य संयोजक आहेत. केंद्रातील मोदी सरकारने रेल्वे विषयीच्या सर्व योजनांची माहिती पोहचविण्याचे काम ही समिती करणार आहेत, तसेच रेल्वे प्रवाशांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी ही समिती काम करणार आहे. अनंत बोरकर यांच्याकडे संपूर्ण मराठवाड्याची संयोजक म्हणूनही जबाबदारी देण्यात आली आहे. यात त्यांना पूर्ण मराठवाडाच्या सर्व रेल्वे स्थानकावर स्थानिक रेल्वे प्रकोष्ट समिती स्थापन करावयाच्या आहेत. आज केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते अनंत बोरकर यांचा या निमित्ताने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळेस बापू घडामोडे, प्रशांत मोदी, मोहन आहेर, संजय खंबायते आदी उपस्थित होते.

# ऑनलाईन खरेदी पडली १० लाखांत

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** वेल्डींग यंत्राची ऑनलाईन खरेदी एका नोकरदाराला चांगलीच महागात पडली. परतावा मिळवून देण्याच्या नावावर एटीएम कार्डचे तपशील प्राप्त करून घेत सायबर लुटारूने या नोकरदाराच्या बँक खात्यातील १० लाख ४३ हजार १५९ रुपयांची रक्कम वळती करून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

तक्रारकर्ते हे सरकारी नोकरदार आहेत. सायबर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी २१ ऑक्टोबरला एका ऑनलाईन शॉपिंग ॲपवरून ४ हजार ४५ रुपये किमतीच्या वेल्डींग यंत्राची मागणी नोंदवली. या यंत्रासाठी त्यांनी एका खासगी वित्तपुरवठा कंपनीच्या कार्डवर ईएमआयद्वारे लगेच पैसेदेखील भरले होते. या वेल्डींग यंत्राचे पार्सल घेऊन कुरिअर कंपनीचा कर्मचारी २९ ऑक्टोबरला त्यांच्या घरी पोहोचला. त्याने त्यांच्या पत्नीला पार्सल प्राप्त करून घेण्यासाठी ओटीपी विचारला. त्यावेळी त्यांच्या पत्नीने त्यांना फोन केला, पण तक्रारकर्ते त्यावेळी कार्यालयात एका बैठकीत व्यस्त होते. ते फोनवर संभाषण करू शकले नाहीत. अखेर कुरिअर कंपनीचा कर्मचारी पार्सल परत घेऊन गेला.

# मराठा आरक्षणासाठी महिलांचा कॅन्डल मार्च; १०१ युवकांचे मुंडन

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील खामसवाडी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी दि.३०ऑक्टोंबर रोजी रात्री शेकडो महिलांनी कॅन्डल मार्च काढून शासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे. एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं , जय जिजाऊ जय शिवराय अशा घोषणा देत येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौका पासुन कॅन्डल मार्चला सुरूवात करण्यात आली. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज चौक, जगदंबा चौक, श्रीराम मंदीर, हनुमान मंदीर, या मार्गाने संपुर्ण गावांमध्ये कॅन्डल मार्च काढून घोषणाबाजी करण्यात येऊन याची सांगता छ. संभाजी महाराज चौकामध्ये करण्यात आली. या मध्ये मराठा समाजासह इतर जाती धर्मातील महीलांनीही सहभाग नोंदवून मराठा आरक्षणाला पाठींबा दर्शविला. त्यामुळे खामसवाडी नगरी घोषणाबाजीने व दिव्यांच्या लखलखाने दुमदुमली होती. त्यानंतर मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी पाच दिवसापासून साखळी पासून चालू आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावे यासाठी अनेक उपोषणे आंदोलने करून ही उपोषण मिळत नसल्यामुळे आज दि.३१ऑक्टोंबर रोजी सकाळी सामूहिक रित्या मराठा समाजातील बांधवांनी प्रशासनाच्या निषेधार्थ (१०१) युवकांनी मुंडन करून शासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे.






# जिंतूर तालुक्यात मराठा समाज आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मराठा आरक्षणाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली असल्यामुळे मराठा समाज आक्रमक झाला असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील जोगवाडा, गणेशपूर, आडगाव फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले तर शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले दरम्यान पाचेगाव, रेपा, मानधानी येथील मराठा बांधवानी भव्य रॅली काढून प्रशासनात निवेदन दिले या रॅलीत महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थितीती होती. राज्य सरकारला मराठा समाजाने दिलेल्या वेळात आरक्षण दिले नाही उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांची तब्यत खालावत जात असल्यामुळे मराठा समाज आक्रमक झाला आहे तालुक्यात ठिकठिकाणी साखळी उपोषण सुरू आहेत शिवाय जोगवाडा, गणेशपूर, आडगाव फाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले तर शहरात कडकडीत बंद ठेवण्यात आला दरम्यान शहरात सकल मराठा समाजातील तरुणांनी शहरात फेरी काढून सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली शिवाय पाचेगाव, रेपा, मानधानी येथील सकल मराठा समाजातील महिलांसह नागरिकांनी भव्य रॅली काढून प्रशासनास निवेदन दिले आहे आगामी काही दिवसात आरक्षणाचा तोडगा निघाला नाही तर आगामी काळात सरकारला आंदोलन झेपणार नसल्याचे आंदोलकांनी आपापल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या आहेत एकंदरीत ठीक ठिकाणी मराठा समाज आक्रमक झालेला दिसून आला आहे.



**उपोषणाचा आजचा तिसरा दिवस :** तालुक्यातील पाचेगाव, बोरी व शहरातील तहसील परिसरात चालू असलेल्या आमरण उपोषणाचा आज तिसऱ्या दिवसही चालू आहे . उपोषणकर्ते बालाजी शिंदे, बाळासाहेब काजळे, पंढरीनाथ शिंदे, विलास रोकडे, शशिकांत चौधरी, संतोष तळेकर यांचे आमरण उपोषण चालू आहे .

# सकल मराठा सामाज्याच्या वतीने श्रीगोंद्यात साखळी उपोषणास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीगोंदा :** राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी एकत्रित निर्णय घेऊन कायदा तयार करून मराठा समाजाला आरक्षण द्यावे. जो पर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तो पर्यंत आक्रमक झालेला मराठा समाज थांबणार नाही. जरांगे यांच्या मार्गदर्शनाखाली गावो गावी आंदोलनाची तीव्रता वाढत असल्याने सरकारने आदिवेश बोलावून आरक्षण द्यावे, असे प्रतिपादन माजी आमदार राहुल जगताप यांनी आज श्रीगोंदा तहसिल कार्यालयासमोर केलेल्या साखळी उपोषण प्रासंगिक केले. राज्यातील सर्व मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांनी सुरु केलेल्या प्राणांतिक उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यासाठी तसेच सर्व मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी श्रीगोंदा तहसिल कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. आश्वासन दिल्याप्रमाणे सरकारने ४० दिवसात मराठा समाजास आरक्षण दिले नाही. मराठा समाजाची फसवणूक केली. याचा निषेध करण्यासाठी व मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी मान्य करावी यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २५ ऑक्टोबर पासून पुन्हा अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी श्रीगोंद्यात साखळी उपोषण सुरु करण्यात आले आहे. या साखळी उपोषणास, माजी आमदार राहुल जगताप, टिळक भोस, संतोष इथापे, ॲड. ऋषिकेश गायकवाड, अरविंद कापसे, सतीश मखरे, प्रविण शेलार, बाळासाहेब बळे, प्रशांत साबळे, शाम जरे, कालिदास जगताप, सुधीर घेगडे, राजाभाऊ लोखंडे, जाहीर जकाते, बालू मखरे, राजेंद्र नागवडे, दैवत जाधव, सचिन खडके, भोजराज मोटे, निलेश कुरुमकर, उपोषण स्थळी उपस्थित राहून पाठिंबा दिला.




काल दि . ३१ ऑक्टोबर रोजी काष्टी येथे सकल मराठा सामाज्याच्या वतीने रस्ता रोखो करण्यात आला होता ., या आंदोलनात माजी आमदार राहुल जगताप यांनी सांगितले होते की श्रीगोंदा तालुक्यात सकल मराठा समाजाच्या वतीने आक्रमक होऊन आंदोलन छेडणार आहे त्याचप्रमाणे दिनांक ०१ नोव्हेंबर पासून श्रीगोंदा तहसील कार्यालय समोर साखळी उपोषणाला सुरुवात करणार आहे या साखळी उपोषणामध्ये सर्वात अगोदर मी हजर असणार आहे त्यानुसार बोलल्याप्रमाणे आज पासून झालेल्या साखळी उपोषणास माजी आमदार राहुल जगताप हे तळ ठोकून त्यांच्या युवक कार्यकर्त्यांसमवेत उपस्थित होते .

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर